## आतील पानात वाचा

- मानवतेचा हातच संकटातील खरा आधार
- लिव्ह-इन रिलेशनशिप विवाहसंस्थेला पर्याय ठरू शकत नाही...
- एमआयडीसीच्या भूसंपादनाला तेरा गावांचा विरोध...



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध



Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०६ | अंक :०५, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१९ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# जुन्याची कास, नव्याची आस धरत 'दैनिक अक्षराजचा ५ वा वर्धापनदिन' दिमाखात संपन्न

- डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचे उदघाटन !
- सत्याची कास धरून अक्षराजने ५ वर्षांत केली निर्भीड पत्रकारिता : डॉ. श्रीपाल सबनीस
- अक्षराजचा वर्धापनदिन : वंचितांचा आवाज बनलेल्या मीडियाचा मान्यवरांकडून गौरव






डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करताना उपास्थित मान्यवर...

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१८, नवी पेठ (पुणे) :**

**''पत्रकारिता म्हणजे सत्तेला जाब विचारणारा आरसा''**

**''कलमेची ताकद लोकशाहीचा कणा आहे.''**

लोकशाहीच्या पटलावर सत्याची कास धरत निर्भीड पत्रकारितेची अमिट मोहर उमटवणाऱ्या दैनिक अक्षराज चा पाचवा वर्धापन दिन सोहळा शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी पत्रकार भवन, नवी पेठ, पुणे येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला मा. डॉ. श्रीपाल सबनीस (८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष), भगवानराव वैराट (संस्थापक अध्यक्ष, झोपडपट्टी सुरक्षा दल), रविंद्र कदम (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लक्ष्मीनगर पोलीस ठाणे, पुणे शहर), हेमंत मुसरीफ (सुप्रसिद्ध कवी, पुणे) यांच्यासह दैनिक अक्षराजचे मुख्य संपादक विनोद गोरे सहसंपादिका प्राजक्ता चव्हाण-गोरे,अक्षराज मीडिया परिवार आणि पत्रकार उपस्थित होते.

लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उदघाटन मा. डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

**मान्यवरांचा सन्मान :** वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला लाभलेल्या उपस्थित मान्यवरांचे संपादकांच्या वतीने शाल, श्रीफळ आणि वृक्ष रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. भगवानराव वैराट यांच्या हस्ते मुख्य संपादक विनोद गोरे आणि सहसंपादिका प्राजक्ता गोरे यांचा सन्मान करण्यात आला. तर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते संपादकांचे पिताश्री कैलास गोरे आणि मातोश्री मंजुळा गोरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

### वाचकांमुळेच अक्षराजची यशस्वी वाटचाल - विनोद गोरे




प्रास्ताविक मनोगत व्यक्त करताना संपादक विनोद गोरे भावुक झाले. ते म्हणाले, आम्ही सामान्य कुटुंबातून येत असल्याने अनेक चढ-उतार पाहिले आहेत. शोषित, वंचित घटकांच्या वेदना जवळून पाहिल्या. त्याच जाणिवेतून अक्षराज मीडियाची निर्मिती झाली. आज अक्षराज मीडिया ६ व्या वर्षात पदार्पण करत आहे. याचे सर्व श्रेय आमच्या वाचक, जाहिरातदार आणि हितचिंतकांना जाते. त्यांच्याच पाठबळावर अक्षराजची यशस्वी वाटचाल सुरू आहे.



**डॉ.श्रीपाल सबनीस म्हणाले,** वंचित-शोषितांच्या वेदना मांडणे असो, महात्मा गांधींपासून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यापर्यंत 'पारतंत्र्य ते स्वातंत्र्य' या विषयावरील लेख असो. कोणत्याही राजकीय दबावाला आणि भांडवलशाहीच्या दहशतीला न बळी पडता दैनिक अक्षराजने केलेल्या निर्भीड पत्रकारितेबद्दल मी कौतुक करतो.

**अक्षराज पुरस्कार २०२६ वितरण**

या सोहळ्यात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना अक्षराज पुरस्कार २०२६ ने गौरविण्यात आले. **पुरस्कार्थी पुढीलप्रमाणे :-**

**संजीवन चव्हाण** - अक्षराज राष्ट्ररक्षक गौरव पुरस्कार २०२६

**संदीप येवले** - अक्षराज आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार २०२६

**पंकज दर्शले** - अक्षराज सुरक्षा गौरव पुरस्कार २०२६

**विनोद हिवाळे** - अक्षराज समाजरत्न पुरस्कार २०२६

**वसंत रांधवन** - अक्षराज सत्यशोधक पत्रकारिता पुरस्कार २०२६

**विनोद वास्कर, प्रणिल कुसाळे** - अक्षराज अचूक वेध पत्रकारिता पुरस्कार २०२६

**सुनील क्षीरसागर, राहुल शिंदे, कृष्णा श्रावणपाटील** - अक्षराज लोकविश्वास पत्रकारिता पुरस्कार २०२६

**अलीम शेख, दत्ता हामंद** - अक्षराज युवा पत्रकारिता पुरस्कार २०२६

**मान्यवरांची मनोगते :**

**कवी हेमंत मुसरीफ म्हणाले,** स्व.ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते अक्षराजची वाटचाल सुरू झाली. 'जुन्याची कास आणि नव्याची आस' धरत दैनिक अक्षराजने पत्रकारितेला व्यवसाय न मानता सर्वांना स्थान दिले. पाच वर्षांच्या वाटचालीत अक्षराजने सत्य पत्रकारिता केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र कदम म्हणाले,** अक्षराज मीडियाने आरसा बनत माझ्या पोलीस सेवेतील चांगले कार्य असो किंवा रोखठोक कारवाई असो, ती संपूर्ण महाराष्ट्रासमोर मांडली. अक्षराजने 'रविंद्र कदम आणि त्यांची राष्ट्रसेवा' हे सत्य काम केले.

**भगवानराव वैराट म्हणाले,** राज्यातील वंचित, शोषित आणि सामान्यांचा आवाज बनून अक्षराज मीडिया महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. दैनिक अक्षराजच्या माध्यमातून अधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या सेवेची दखल घेतली जाते, हेच मोठे यश आहे. तुम्ही आमच्यापेक्षा श्रेष्ठ आहात.

सदर सोहळ्याला संपूर्ण महाराष्ट्रातून अक्षराजचे प्रतिनिधी वाचक, लेखक, हितचिंतक व मित्रपरिवार मोठया संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते एकनाथ सकपाळ यांनी केले. आभार प्रदर्शन सहसंपादिका प्राजक्ता चव्हाण-गोरे यांनी केले.

# आमदारांचे पीए आणि वाहनचालकांच्या मानधनात वाढ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, मुंबई :** महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांच्या स्वीय सहाय्यक आणि वाहनचालकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार स्वीय सहाय्यकांचे मासिक मानधन ३० हजार रुपयांवरून ४० हजार रुपये, तर वाहनचालकांचे मासिक मानधन २० हजार रुपयांवरून ३० हजार रुपये करण्यात आले आहे. ही वाढ १ ऑगस्ट २०२६ पासून लागू करण्यात आली असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील तरतुदींनुसार विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांना त्यांचे विधिमंडळाचे प्रशासकीय कामकाज अधिक परिणामकारकपणे पार पाडण्यासाठी स्वीय सहाय्यकांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते, असं मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले.



विधानमंडळ सदस्यांच्या वेतन आणि भत्ते संयुक्त समितीच्या शिफारशीनुसार स्वीय सहाय्यकांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने स्वीय सहाय्यक आणि वाहनचालकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

# नाशिक-संभाजीनगर महामार्गावर थरार!




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील दहेगाव-भरवस फाट्याजवळ सोमवारी (दि. १७) पहाटे पाच वाजेच्या सुमारास एका पेट्रोल पंप कर्मचाऱ्यासह त्याच्या सहकाऱ्याला चाकू व लोखंडी गजाचा धाक दाखवून लुटल्याची धक्कादायक घटना घडली. तिघा अज्ञात आरोपींनी रोख रक्कम, दोन मोबाईल आणि एक दुचाकी असा एकूण ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने लंपास केला.

या प्रकरणी पेट्रोल पंप ऑपरेटर जनार्धन शिवाजी गांगुर्डे (रा. वाकी खु., ता. चांदवड) यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी जनार्धन गांगुर्डे व त्यांचे सहकारी संजय भालेराव हे दहेगाव-भरवस फाट्याजवळ असताना तिघा अनोळखी इसमांनी त्यांना गाठले. आरोपींनी संगनमत करून दोघांना चाकू व लोखंडी गजाचा धाक दाखवला आणि धमकावून ५०० रुपयांच्या ८० नोटा, २०० रुपयांच्या २० नोटा व १०० रुपयांच्या ३० नोटा अशी रोख रक्कम तसेच दोन मोबाईल फोन असा सुमारे ५१ हजार रुपयांचा ऐवज हिसकावून घेतला.

# रंजल्या गांजल्यांच्या सेवेसाठी वारकरी धर्म परिषदेत सामील व्हावे : ह.भ.प. वाघमारे महाराज

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, मोताळा (बुलडाणा) :** जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा, तेथेची माथा झुकवावा या उदांत भावनेतून वारकरी संप्रदायाची सर्वांगीण सेवा विचार मंथनाच्या क्रांतीतून करण्यासाठी वारकरी धर्म परिषदेच्या विचार प्रवाहात सामील व्हावे. असे आवाहन वारकरी धर्म परिषदेचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष सुप्रसिद्ध कथाकार हभप विलास महाराज वाघमारे यांनी केले

मोताळा तालुक्या अंतर्गत येणाऱ्या ग्राम आवा येथे हनुमंतरायांच्या सभा मंडपात १७ ऑगस्टला एकदिवसीय वारकरी संवाद परिषदेमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून हभप विलास महाराजांनी उपरोक्त मत व्यक्त केले.

वारकरी धर्म परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष वारकरी धर्मभूषण वासुदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शन आणि निर्देशावरून सुरू झालेल्या या वारकरी संवाद मेळाव्याला वारकरी धर्म परिषदेचे राष्ट्रीय महासचिव प्रबोधनकार हभप सतीशचंद्र रोठे पाटील, जिल्हाध्यक्ष प्रकाश महाराज घोंगटे, महिला जिल्हा उपाध्यक्ष सुनंदाताई घोंगटे, मोताळा तालुका अध्यक्ष रमेश पाटील, मलकापूर तालुकाध्यक्ष राजेंद्र कोलते, संतोष घुमते सतीश गोमटे पाटील भगवान घोंगटे गुरुजी नंदकिशोर घुमटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम विठ्ठल रुक्मिणी आणि हनुमंत रायांचे पूजन, वारकरी धर्म परिषदेच्या शाखा नाम फलकाचे अनावरण करून वारकरी संवाद मेळाव्याला सुरुवात करण्यात आली. त्यावेळी उपस्थित सर्वच मान्यवरांनी वारकरी सांप्रदायिक कार्यपद्धती आणि वर्तमान स्थितीवर वैचारिक



उद्बोधन प्रबोधन केले. त्यानुसार काही महत्त्वपूर्ण ठरावही सर्वानुमते पारित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष प्रकाश घोंगटे महाराज यांनी तर आभार प्रदर्शन भागवत घोंगटे गुरुजी यांनी व्यक्त केले. यशस्वीतेसाठी

सचिव गंगाताई वक्टे, तेजस्वीनी चोपडे,योगिता अवचार, शालिनी भंगाडे, ज्ञानेश्वर महाराज, श्रीराम महाराज, भिमराव घोंगटे, किसना गवळी, सोनाजी घोंगटे, सुभाष घोंगटे, प्रशांत घोंगटे, श्रीकृष्ण अवचार, सीमा बोलले, प्रमोद शीगोटे, मनिषा शेळके, विवेक घोंगटे, काशीनाथ घोंगटे, विशाल घोंगटे यासह वारकरी धर्म परिषदेचे मोताळा, मलकापूर, नांदुरा, खाम गाव, बुलढाणा तालुक्यातील समस्त महिला, पुरुष पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

महिला व युवतींची लक्षणीय उपस्थिती मेळाव्याचे विशेष आकर्षण ठरली. गाव स्वच्छता अभियान,पसायदान आणि महाप्रसादाने सांगता करण्यात आली.

**वारकरी संवाद मेळाव्यामध्ये महत्त्वपूर्ण ठराव पारित...**

गाव तेथे सामूहिक काकड आरती आणि हरिपाठ घेने, मंदिर परिसर स्वच्छता, वृक्षारोपण आणि प्रत्येक गावामध्ये बाल संस्कार युवक संस्कार शिबिरांचे आयोजन करने. युवकांना व्यसनमुक्त करणे. वारकरी युवक युवतींना सांप्रदायिक धार्मिक संस्कारांचे प्रशिक्षण देणे. आदी ठराव सर्वानुमते पारित करण्यात आले.




## थांबेनात उपेक्षेचे दंश

विद्यार्थ्यांनी मेहनतीने अभ्यास करून जीवनात मोठे व्हावे, यशस्वी व्हावे,' असं तत्कालीन राज्यपाल आचार्य देवव्रत काही महिन्यांपूर्वी नाशिक दौऱ्यात म्हणाले होते. पिंपरखेडच्या (ता. दिंडोरी, जि. नाशिक) आश्रमशाळेत ते मुक्कामी राहिले. आदिवासी मुलांना उपदेशाचे डोस पाजून त्यांनी प्रसारमाध्यमांचं लक्ष वेधलं. परंतु, या मुलांना किमान पोषक अन्न, पुरेशी वस्त्रं व सुरक्षित निवारा मिळाला, तरच ते शिकून मोठे होऊ शकतील आणि या मूलभूत गरजा पुरविण्याची जबाबदारी आपलीच आहे, याचं विस्मरण राज्यपाल व त्यांच्या सरकारलाही झालं. जपतलाई (जि. गडचिरोली) आश्रमशाळेतील तीन विद्यार्थिनींचा सर्पदंशाने झालेला मृत्यू हा त्याचा जिवंत पुरावा. त्याआधी काही महिन्यांपूर्वी आदिवासीमंत्री व अधिकाऱ्यांनीही यवतमाळच्या आश्रमशाळेत तोच कित्ता गिरवला. विद्यार्थ्यांसमवेत जेवण घेऊन त्यांच्याप्रतिचा कळवळा 'ऑन कॅमेरा' दाखवून दिला. परंतु, त्यांची पाठ फिरताच मागे सारं सपाट.

आदिवासी विद्यार्थी सुविधांबाबत वारंवार कमनशिबी ठरतात. त्यांना ना अंघोळीसाठी गरम पाणी मिळतं, ना मच्छरदाणी, ना पलंग! हे सरकारचं अपयश नव्हे काय? पुढारलेपणाची टिमकी मिरविणाऱ्या राज्यासाठी लाजिरवाणी बाबसुद्धा; पण सध्या ही लाज बाळगतो कोण? मग मंत्री-राज्यपालांच्या मुक्कामांचा परिपाक काय? खरं तर त्यांचे दौरे म्हणजे चमकोगिरी वा निव्वळ इव्हेंटबाजी. दर्जाहीन आहारात अळ्या, मेलेल्या पाली निघण्याची मालिका सुरूच असते. विद्यार्थ्यांच्या जिवावर बेतणारी एखादी घटना घडली की चौकशी, अहवाल, शिफारशी, निलंबन वगैरे पार पडतं. परंतु, त्यानंतरही परिस्थितीत तसूभर फरक पडत नाही. राज्यात सरकारी आणि खासगी मिळून एक हजार पन्नास आश्रमशाळा. त्या राजकारण्यांच्याच दावणीला बांधल्या गेल्या आहेत. दोन वर्षांत या संस्थांत साडेचारशेहून अधिक लेकरांचे जीव गेले. सर्पदंश, अपघात, आजारपण ही त्याची मुख्य कारणं. विद्यार्थ्यांचे सर्वाधिक मृत्यू घरीच झाले, असा दावा आदिवासी 'विकास' विभाग करतो. परंतु, विद्यार्थी आजारी पडल्यानंतर त्याला घरी पाठविणारे महाभाग आम्हीच, हे मात्र झाकून ठेवलं जातं. यावर उपाय करण्याऐवजी त्यांना उघडं पाडणाऱ्या संघटना, पत्रकारांना आश्रमशाळांत मज्जाव करण्याचे आदेश मात्र तातडीने निघतात. गोरगरीब विद्यार्थ्यांचे बळी जाण्याच्या घटना पाहिल्या की, सामान्यांचं काळीज पिळवटतं. परंतु, निष्ठूर व्यवस्थेला पाझर फुटत नाही. फुटल्यास तो केवळ कंत्राटदार, अधिकारी आणि स्वत:च्या तुंबड्या भरण्यासाठीच.

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर नेहमीच भर दिला. २००५ मध्ये त्यांनी इगतपुरीतील वैतागवाडीला भेट दिली. या गावाचं नाव बदलून आशाकिरणवाडी ठेवलं. परंतु, दुर्दैवाने तिथल्या विद्यार्थ्यांना आजही खस्ता खात शाळेत जावं लागतं. मुलांच्या पंखांत शिक्षणाचं बळ भरल्यास हा समाज दारिद्र्याच्या खाईतून बाहेर येईल, असा विश्वास कलाम जागवत. परंतु, सरकारी अनास्था आणि बेपर्वाई तिथंही वरचढ ठरली. कलामांच्या रूपाने आशेचा किरण उगवला खरा; पण उजेडाची ही तिरीप वैतागवाडीला उजळून टाकू शकली नाही. या काळात आदिवासींसाठी किमान बारा-पंधरा हजार कोटींच्या योजना झिरपल्या. परंतु, शाळांत साधे बेड उपलब्ध होऊ शकले नाहीत. साळुंखे समितीनेही दहा-बारा वर्षांपूर्वी त्याबाबत सांगूनही पाहिलं. परंतु, उपयोग झाला नाही. आता कदाचित बेड मिळतीलही; परंतु ते तकलादू असतील. कारण हजारो कोटींच्या भ्रष्टाचाराचा दंश त्यांना झालेला असेल. रिवाजाप्रमाणे चौकशीसाठी बसलेल्या समितीच्या शिफारशींची झाकाझाकही आपसूक होईलच. आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न केवळ आश्रमशाळा वा शिष्यवृत्तीपुरते खचितच मर्यादित नाहीत; ते त्यांची सुरक्षितता, सन्मान आणि भविष्याशी निगडित आहेत, हे कोणी लक्षात घ्यायला तयार नाही. आणि हेच अधिक दुर्दैवी आहे.

**- श्याम ठाणेदार**

# मानवतेचा हातच संकटातील खरा आधार

दरवर्षी १९ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक मानवतावादी दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. संकटाच्या काळात मानवतेची सेवा करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना अभिवादन करणे, युद्ध, नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, साथीचे रोग, विस्थापन, गरिबी आणि विविध मानवी संकटांमध्ये अडकलेल्या लोकांच्या वेदनांकडे जगाचे लक्ष वेधणे तसेच प्रत्येक मानवाच्या जीवनाचा आणि प्रतिष्ठेचा सन्मान करण्याचा संदेश देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. मानवतावाद म्हणजे केवळ संकटाच्या वेळी मदत करणे नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून समान सन्मान, सुरक्षितता आणि जगण्याचा अधिकार आहे, ही जाणीव मनात दृढ करणे होय. संकटग्रस्तांच्या मदतीसाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या मानवतावादी कार्यकर्त्यांचे योगदान या दिवशी विशेषत्वाने स्मरणात घेतले जाते. त्यामुळे जागतिक मानवतावादी दिन हा माणुसकीच्या सामर्थ्याचा, करुणेचा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा जागतिक जागर ठरतो.

१९ ऑगस्ट २००३ रोजी बगदाद येथील संयुक्त राष्ट्रांच्या कॅनाल हॉटेलवरील बॉम्बस्फोटात २२ मानवतावादी कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला; त्यांच्या स्मरणार्थ संयुक्त राष्ट्रांनी १९ ऑगस्ट हा 'जागतिक मानवतावादी दिन' म्हणून घोषित केला. हा दिवस संकटग्रस्तांच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या मानवतावादी कार्यकर्त्यांच्या धैर्याला आणि त्यागाला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

मानवतावादाची संकल्पना मुळात अत्यंत व्यापक आहे. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव होणे, त्याच्या वेदनेशी आपले भावनिक नाते जोडले जाणे आणि शक्य त्या पद्धतीने त्याच्या मदतीला धावून जाणे म्हणजे मानवतावाद. यात दया आणि सहानुभूतीबरोबरच समानता, न्याय, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचा विचार अंतर्भूत आहे. एखादी व्यक्ती कोणत्या धर्माची आहे, कोणत्या जातीची आहे, तिची भाषा कोणती आहे, ती कोणत्या प्रदेशातून आली आहे किंवा तिची आर्थिक परिस्थिती काय आहे, याचा विचार न करता तिच्या संकटात मदतीचा हात पुढे करणे ही मानवतावादी वृत्ती होय. मानवतावाद माणसामाणसांतील कृत्रिम भेद ओलांडतो. म्हणूनच मानवतावाद हा कोणत्याही एका धर्माचा, देशाचा किंवा समाजाचा विचार नसून संपूर्ण मानवजातीला जोडणारे सार्वत्रिक मूल्य आहे.

आजच्या जगाकडे पाहिले तर मानवतावादी कार्याची गरज किती मोठी आहे, हे सहज लक्षात येते. जगाच्या विविध भागांत युद्धे आणि सशस्त्र संघर्ष सुरू आहेत. लाखो लोकांना आपली घरे सोडून विस्थापित व्हावे लागत आहे. अनेक कुटुंबांचे उपजीविकेचे साधन नष्ट होत आहे. मुलांचे शिक्षण खंडित होत आहे. रुग्णालये आणि आरोग्यसेवा बाधित होत आहेत. अन्न, पाणी आणि औषधांची टंचाई निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकांचे जीवन अत्यंत असुरक्षित होते. महिला, बालके, वृद्ध, दिव्यांग व्यक्ती आणि आजारी व्यक्तींना संकटाचा अधिक तीव्र परिणाम सहन करावा लागतो. त्यामुळे मानवतावादी मदत ही केवळ अतिरिक्त सुविधा नसून अशा परिस्थितीत जीवन वाचविण्यासाठी अत्यावश्यक व्यवस्था बनते.

युद्धाच्या काळात मानवतावादी कार्याचे महत्त्व विशेष वाढते. युद्ध कोणत्याही कारणाने सुरू झाले असले तरी त्याची सर्वाधिक झळ सामान्य नागरिकांना बसते. घरांवर बॉम्बहल्ले होतात, रस्ते आणि पूल उद्ध्वस्त होतात, रुग्णालयांवर ताण वाढतो आणि मूलभूत सुविधा कोलमडतात. अशा वेळी मानवतावादी कार्यकर्ते अन्न, पाणी, औषधे, वैद्यकीय सेवा, निवारा आणि सुरक्षिततेशी संबंधित मदत पोहोचविण्याचे काम करतात. अनेक वेळा ते अशा प्रदेशांत काम करतात, जिथे स्वतःच्या जीवाला मोठा धोका असतो. तरीही मानवतेच्या सेवेसाठी ते आपले कर्तव्य पार पाडतात. म्हणूनच मानवतावादी कार्यकर्त्यांची सुरक्षितता ही संपूर्ण जगाची जबाबदारी आहे. मदतकार्य करणाऱ्या व्यक्तींवर हल्ले होणे म्हणजे मानवतेवरच हल्ला होय.

मानवतावादी कार्य केवळ युद्धाच्या प्रदेशांपुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या वेळीही त्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. पूर, भूकंप, चक्रीवादळ, भूस्खलन, दुष्काळ, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा आणि जंगलातील आगी यांसारख्या आपत्तींमुळे हजारो कुटुंबांचे जीवन विस्कळीत होते. घरांचे नुकसान होते, पिके नष्ट होतात, जनावरे मृत्युमुखी पडतात आणि रोजगाराची साधने हिरावली जातात. अशा वेळी तातडीने अन्न, पाणी, कपडे, औषधे आणि निवारा उपलब्ध करून देणे आवश्यक असते. मात्र मदतकार्य केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे न राहता पुनर्वसन आणि पुनर्निर्माणाशी जोडले गेले पाहिजे. आपत्तीग्रस्त व्यक्तीला पुन्हा स्वावलंबी बनविणे आणि तिच्या जीवनाला स्थैर्य मिळवून देणे हा मानवतावादी दृष्टिकोनाचा महत्त्वाचा भाग आहे.

हवामानबदलामुळे मानवतावादी संकटांचे स्वरूप आणखी गुंतागुंतीचे झाले आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दीर्घकालीन दुष्काळ, चक्रीवादळे आणि इतर हवामानविषयक संकटांचा परिणाम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांवर अधिक होतो. ग्रामीण भागातील शेतकरी, भूमिहीन कामगार, आदिवासी समुदाय, स्थलांतरित कामगार आणि गरीब कुटुंबे या संकटांना अधिक असुरक्षित असतात. त्यामुळे मानवतावादाचा विचार पर्यावरणीय न्यायाशी जोडणे आवश्यक झाले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, शाश्वत विकास, आपत्तीपूर्व तयारी आणि स्थानिक समुदायांचे सक्षमीकरण यांचा मानवतावादी कार्यात समावेश झाला पाहिजे.

भारतीय समाजाच्या परंपरेत मानवतावादाला फार मोठे स्थान आहे. संत परंपरेने माणुसकी, समता, बंधुभाव आणि करुणेचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्थेची भूमिका मांडली. भारतीय संविधानाची प्रस्तावनाही न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर समाजाची उभारणी करण्याचा संदेश देते. त्यामुळे आधुनिक मानवतावादाची मूल्ये भारतीय लोकशाहीच्या मूलभूत विचारांशी अतिशय जवळची आहेत.

मानवतावादाचा केंद्रबिंदू म्हणजे मानवी प्रतिष्ठा होय. मदत करताना गरजू व्यक्तीकडे केवळ 'दयेचे पात्र' म्हणून पाहणे योग्य नाही. संकटग्रस्त व्यक्तीलाही स्वाभिमान, निर्णयक्षमता आणि अधिकार असतात. त्यामुळे मानवतावादी मदत ही सन्मानपूर्वक आणि गरजू व्यक्तीच्या गरजा लक्षात घेऊन दिली पाहिजे. अन्न किंवा कपडे देणे ही तातडीची गरज भागविणारी कृती असली तरी त्यापुढे जाऊन रोजगार, शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास आणि सामाजिक सुरक्षितता उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मदत घेणाऱ्या व्यक्तीला पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहता येईल, अशी परिस्थिती निर्माण करणे हेच खरे सक्षमीकरण होय.

मानवतावादी कार्यामध्ये स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समुदायांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आपत्तीच्या वेळी सरकारी यंत्रणा मदतीसाठी प्रयत्नशील असते; परंतु प्रत्येक व्यक्तीपर्यंत तातडीने पोहोचणे नेहमी शक्य होत नाही. अशा वेळी स्थानिक स्वयंसेवक, सामाजिक संस्था, युवक मंडळे, महिला बचतगट, विद्यार्थी संघटना आणि समुदायाधारित संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांना स्थानिक परिस्थिती, भाषा आणि गरजांची माहिती असल्यामुळे मदतकार्य अधिक परिणामकारक ठरते. संकटाच्या काळात समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन काम केल्यास उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर होतो आणि अधिकाधिक लोकांपर्यंत मदत पोहोचविता येते.

युवकांची भूमिका या संदर्भात विशेष महत्त्वाची आहे. युवकांमध्ये ऊर्जा, तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि सामाजिक सहभागाची क्षमता मोठी असते. रक्तदान, अन्नवाटप, आपत्तीग्रस्तांना मदत, जनजागृती, स्वच्छता अभियान, आरोग्यशिबिरे आणि सामाजिक माध्यमांद्वारे मदतसंकलन अशा अनेक क्षेत्रांत युवक प्रभावी योगदान देऊ शकतात. शिक्षणसंस्थांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान आणि कौशल्ये विकसित न करता सामाजिक संवेदनशीलता, सहानुभूती आणि स्वयंसेवेची भावना निर्माण केली पाहिजे. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट केवळ रोजगारप्राप्ती नसून जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडविणे हेही आहे.

दिव्यांग व्यक्तींच्या संदर्भात मानवतावादी दृष्टिकोन अधिक संवेदनशील असणे आवश्यक आहे. आपत्तीच्या वेळी स्थलांतर, सुरक्षित निवारा, वाहतूक, आरोग्यसेवा आणि माहिती मिळविताना दिव्यांग व्यक्तींना अनेक अडचणी येऊ शकतात. म्हणून आपत्ती व्यवस्थापनाच्या योजना सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. माहिती सर्वांना समजेल अशा पद्धतीने उपलब्ध करणे, प्रवेशयोग्य निवारे तयार करणे, सहाय्यक साधने उपलब्ध करून देणे आणि आवश्यकतेनुसार प्रशिक्षित स्वयंसेवकांची मदत देणे ही समाजाची जबाबदारी आहे. मानवतावादाची खरी कसोटी समाजातील सर्वाधिक असुरक्षित व्यक्तीपर्यंत मदतीचा हात पोहोचतो की नाही, यात आहे.

डिजिटल युगाने मानवतावादी कार्यासाठी नवीन संधी निर्माण केल्या आहेत. सामाजिक माध्यमांमुळे एखाद्या आपत्तीची माहिती काही क्षणांत जगभर पोहोचू शकते. डिजिटल निधीसंकलन, स्थाननिश्चिती तंत्रज्ञान, उपग्रहचित्रे, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहिती व्यवस्थापनाच्या आधुनिक साधनांमुळे मदतकार्य अधिक जलद आणि परिणामकारक करता येते. मात्र डिजिटल माध्यमांमध्ये चुकीची माहिती, अफवा आणि बनावट मदत आवाहनेही वेगाने पसरू शकतात. त्यामुळे माहितीची सत्यता तपासणे, पारदर्शकता राखणे आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर मानवतेच्या सेवेसाठी झाला पाहिजे; मानवी असुरक्षिततेचा गैरफायदा घेण्यासाठी नव्हे.

मानवतावादाचा संबंध सामाजिक न्यायाशीही आहे. संकट निर्माण झाल्यानंतर मदत करणे महत्त्वाचे आहे; परंतु समाजातील विषमता, गरिबी, बेरोजगारी, अशिक्षण, आरोग्यसेवेतील तफावत आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या संकटांच्या मूळ कारणांकडेही लक्ष दिले पाहिजे. जे समुदाय आधीपासूनच आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल आहेत, ते आपत्तीच्या काळात अधिक असुरक्षित होतात. म्हणून मानवतावादी कार्याबरोबर सामाजिक सक्षमीकरणाची प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक संरक्षणाची समान संधी मिळाली तर संकटांचा सामना करण्याची तिची क्षमता वाढते.

जागतिक मानवतावादी दिन हा त्यामुळे केवळ मानवतावादी कार्यकर्त्यांना अभिवादन करण्याचा दिवस नाही; तो आपल्या सामाजिक संवेदनशीलतेची परीक्षा घेणारा दिवस आहे. आपल्या आसपास एखादा वृद्ध मदतीच्या प्रतीक्षेत आहे का, एखादे गरीब कुटुंब अडचणीत आहे का, एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आधाराची गरज आहे का, एखाद्या दिव्यांग व्यक्तीला सामाजिक सहकार्याची आवश्यकता आहे का किंवा एखादा आपत्तीग्रस्त नागरिक मदतीची अपेक्षा करीत आहे का, याचा विचार करण्याची ही संधी आहे. मानवतावाद मोठ्या घोषणांमध्ये नसतो; तो छोट्या-छोट्या कृतींमध्ये जगतो. एखाद्याला पाणी देणे, रक्तदान करणे, जखमीला रुग्णालयात पोहोचविणे, संकटात असलेल्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, या कृतीही मानवतेच्या सेवाच आहेत.

आज जग विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने पुढे जात आहे; परंतु या प्रगतीला मानवी संवेदनशीलतेची जोड मिळाली नाही तर ती अपूर्ण राहील. उंच इमारती, वेगवान वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञान आणि आर्थिक विकास यांना खरे मूल्य तेव्हाच प्राप्त होते, जेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित, सन्मानाने आणि आशेने जगू शकते. म्हणूनच मानवतावादी मूल्ये ही आजच्या जगाची गरज आहेत. संघर्षाऐवजी शांतता, द्वेषाऐवजी प्रेम, भेदभावाऐवजी समता, उदासीनतेऐवजी सहानुभूती आणि स्वार्थाऐवजी सहकार्य स्वीकारण्याची आवश्यकता आहे.

१९ ऑगस्टचा जागतिक मानवतावादी दिन आपल्याला याच मूल्यांची आठवण करून देतो. संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करणारे मानवतावादी कार्यकर्ते हे जगाच्या सामूहिक सद्सद्विवेकबुद्धीचे प्रतीक आहेत. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे स्वतःच्या जीवनात मानवतेची मूल्ये रुजविणे. मानवतावाद हा एका दिवसापुरता मर्यादित राहू नये; तो आपल्या कुटुंबात, शाळेत, महाविद्यालयात, कार्यस्थळी आणि समाजजीवनात सतत आचरणात आणला पाहिजे. कारण माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी मोठ्या पदाची किंवा संपत्तीची आवश्यकता नसते; आवश्यक असते ती दुसऱ्याच्या वेदनेची जाणीव आणि मदतीसाठी पुढे येण्याची तयारी.

मानवतेचा खरा विजय तेव्हा होतो, जेव्हा संकटात सापडलेल्या व्यक्तीला आपण एकटे पडू देत नाही. तिच्या अश्रूंमध्ये आपले अश्रू मिसळण्याची, तिच्या वेदनेत सहभागी होण्याची आणि तिच्या अंधारात आशेचा दिवा पेटविण्याची तयारी ठेवतो. जागतिक मानवतावादी दिनाचा संदेश म्हणून आपण एवढेच लक्षात ठेवू या की, जग बदलण्याची सुरुवात मोठ्या घोषणांपासून नव्हे, तर एका माणसाने दुसऱ्या माणसासाठी पुढे केलेल्या मदतीच्या हातापासून होते. संकट कितीही मोठे असो, माणुसकीची शक्ती त्याहून मोठी असते. म्हणूनच मानवतेचा हात धरू या, करुणेची वाट चालू या आणि प्रत्येकाच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारासाठी संवेदनशील समाजाची निर्मिती करू या. हाच जागतिक मानवतावादी दिनाचा खरा संदेश आणि मानवजातीच्या उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## भाषण

भाषण करणे कला
पाळा सभेचे नियम
श्रोते वजा शून्यसर्व
लक्षात ठेवी कायम

समस्या अन् उत्तरा
मधले सार्थ माध्यम
शब्द होई वजनदार
स्वर असावा मध्यम

कठोर पत्थरासमान
कधी होई मुलायम
समजून घ्या विषय
आधी घ्या परिश्रम

मन सर्व सद्गुणांचा
आधी व्हावा आश्रम
जाणून घ्यावे अंतस्थ
काय आहे कार्यक्रम

वेळ पाळा आवर्जून
बदलो भले दिनक्रम
स्पष्टता हवी विचारा
नको कोणता संभ्रम

असंबद्ध नको बोल
मनी घोंघवी व्युत्क्रम
पध्दतशीरता अभाव
अव्यवस्था रे उत्क्रम

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# लिव्ह-इन रिलेशनशिप विवाहसंस्थेला पर्याय ठरू शकत नाही

बदलत्या जीवनशैलीबरोबर नातेसंबंधांचे स्वरूपही बदलत आहे. शहरांमध्ये काही तरुण-तरुणी विवाह न करता एकत्र राहण्याचा अर्थात 'लिव्ह-इन रिलेशनशिप'चा पर्याय स्वीकारताना दिसतात. परस्परांची समज, स्वभाव आणि सुसंवाद तपासण्यासाठी हा पर्याय निवडला जात असल्याचे सांगितले जाते. मात्र लिव्ह-इन रिलेशनशिपला विवाहसंस्थेचा पर्याय मानणे योग्य ठरेल का, हा सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवर विचार करण्याचा विषय आहे. भारतीय कायद्यात लिव्ह-इन रिलेशनशिपला सरसकट गुन्हा ठरवलेले नाही. मात्र प्रत्येक लिव्ह-इन नात्याला विवाहाचा दर्जा किंवा विवाहातील सर्व कायदेशीर अधिकार आपोआप मिळत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने काही विशिष्ट परिस्थितीत 'विवाहाच्या स्वरूपातील संबंध' मानल्या जाणाऱ्या नात्यांना घरगुती हिंसाचारापासून संरक्षणाच्या कायद्यानुसार संरक्षण मिळू शकते, असे स्पष्ट केले आहे. त्यासाठी नात्याचा कालावधी, सामायिक घर, कौटुंबिक व्यवस्था, आर्थिक व्यवहार आणि दोघांचा नात्याबाबतचा हेतू अशा विविध बाबींचा विचार केला जातो. म्हणूनच लिव्ह-इन नात्याकडे केवळ स्वातंत्र्याचा किंवा आधुनिकतेचा पर्याय म्हणून पाहणे पुरेसे नाही. कोणतेही नाते परस्परांचा आदर, विश्वास, समानता, जबाबदारी आणि संवादावर टिकते. विवाहसंस्थेतही मतभेद होतात, संघर्ष होतात आणि काही वेळा नाती तुटतात. त्यामुळे विवाहसंस्थेत समस्या नाहीत, असे म्हणता येणार नाही. मात्र त्याच कारणामुळे विवाहसंस्था निरुपयोगी ठरते, असेही म्हणता येणार नाही. लिव्ह-इन असो किंवा विवाह, नात्यातील व्यक्तींनी एकमेकांच्या अधिकारांचा, स्वातंत्र्याचा आणि सुरक्षिततेचा आदर करणे आवश्यक आहे. नात्यात हिंसा, दबाव, फसवणूक किंवा शोषणाला कोणत्याही परिस्थितीत स्थान असू नये. कायदाही अशा परिस्थितीत संरक्षणाची तरतूद करतो. विवाह ही केवळ सामाजिक परंपरा नसून भारतीय समाजजीवनातील एक महत्त्वाची संस्था आहे. प्रेम, विश्वास, परस्पर सहकार्य, त्याग, तडजोड आणि जबाबदारी यांवर तिची उभारणी होते. त्यामुळे आधुनिक जीवनशैली स्वीकारताना परंपरेचा अंधानुकरणाने पुरस्कार किंवा विरोध करण्याऐवजी प्रत्येक नात्याच्या जबाबदाऱ्या आणि परिणामांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.लिव्ह-इन रिलेशनशिपचा स्वीकार करणाऱ्या व्यक्तींवर सामाजिक टीका करणे हा उपाय नाही; त्याचप्रमाणे विवाहसंस्थेकडे कालबाह्य व्यवस्था म्हणून पाहणेही योग्य नाही. नात्याचे यश त्याच्या नावात नसून परस्पर आदर, विश्वास, समानता आणि जबाबदारीत असते. त्यामुळे लिव्ह-इन रिलेशनशिप हा काही व्यक्तींसाठी निवडीचा पर्याय असू शकतो; परंतु त्याला विवाहसंस्थेचा सार्वत्रिक पर्याय मानणे योग्य ठरणार नाही.

**- श्याम ठाणेदार, दौंड, जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात बातम्या

### खापरखेडा येथे डॉ.अनिरुद्ध वानकर यांचा भव्य प्रबोधनाचा कार्यक्रम



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, खापरखेडा (नागपूर) :** माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या ८२व्या जयंतीनिमित्त तसेच सद्भावना दिवसाच्या पर्वावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या वतीने अनुसूचित जाती 'संविधान सत्यशोधक जलसा' अभियानाचा भव्य उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या अभियानांतर्गत 'संविधान सत्यशोध क जलसा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून 'समतेची-संविधानाची गाणी, महापुरुषांची' या संकल्पनेवर आधारित संविधान, सामाजिक समता आणि महापुरुषांच्या विचारांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम २० ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता काँग्रेस कार्यालय, मेन रोड, खापरखेडा येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक माजी कॅबिनेट मंत्री सुनील केदार आहेत. यावेळी डॉ. अनिरुद्ध वानकर यांच्या भव्य प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संविधान, सामाजिक समता आणि महापुरुषांच्या विचारांवर आधारित या प्रबोधनातून नागरिकांना सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला जाणार आहे. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक यांनी केले.

### पेठशिवणीच्या पाणी प्रश्नावर तहसीलवर धडकला मोर्चा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील पेठशिवणी येथील पाणीपुरवठा योजनेसाठी मोठा निधी मंजूर होऊनही गावाला पाणी मिळत नसल्याच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढला. ॲड. अविनाश भोसीकर यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या या मोर्चानंतर पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणी प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर उपोषणकर्त्यांनी अन्नत्याग उपोषण मागे घेतले. पेठशिवणी गावातील पाणी प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दत्ता डोके आणि शिवराज वाढवले यांनी १४ ऑगस्टपासून बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरू केले होते. मात्र, प्रशासनाकडून अपेक्षित दखल घेतली जात नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढली होती. यामुळे अंकुश भातमोडे व महेश भोसीकर यांनी प्रशासनाला निवेदन देऊन तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार दि.१८ ऑगस्ट २०२६ रोजी पेठशिवणी येथील नागरिकांनी तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी ॲड.अविनाश भोसीकर यांनी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. नागरिकांच्या आक्रमक भूमिकेनंतर अधिकाऱ्यांनी पाणी प्रश्न सोडविण्याचे लेखी आश्वासन दिले. लेखी आश्वासनानंतर ॲड. अविनाश भोसीकर यांनी उपोषणकर्ते व प्रशासनामध्ये समन्वय साधला. त्यानंतर दत्ता डोके व शिवराज वाडेवाले यांना लिंबू पाणी पाजून उपोषणाची सांगता करण्यात आली.

या मोर्चात पेठशिवणी येथील नागरिक व महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आता प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी होऊन गावाला प्रत्यक्ष पाणी कधी मिळते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पालम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आदित्य लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### वरोऱ्यात पिस्तूल व मॅगझीनसह एका आरोपीस अटक

#### स्थानिक गुन्हे शाखा व वरोरा पोलिसांची संयुक्त कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** वरोरा शहरात अवैधरित्या पिस्तूल बाळगणाऱ्या एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर व वरोरा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत अटक केली. या कारवाईत आरोपीकडून पिस्तूल व मॅगझीन असा सुमारे ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यासंदर्भात मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संयुक्तपणे संतोष सेलोकर यांच्या राहत्या घरी छापा टाकला. घराची झडती घेतली असता एक पिस्तूल व मॅगझीन आढळून आले. पोलिसांनी हे अग्निशस्त्र जप्त केले असून त्याची अंदाजे किंमत ५०,००० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व वरोरा पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथक वरोरा शहरात पेट्रोलिंग करीत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, संतोष दादाजी सेलोकर (वय ४८, रा.मित्र चौक, वरोरा) याने आपल्या राहत्या घरात अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगले आहे. पोलिसांनी आरोपीकडे अग्निशस्त्राबाबत चौकशी केली असता, त्याने सदर पिस्तूल मित्र चौक, वरोरा येथील देवा नोकरकर यांच्याकडून आणल्याचे सांगितले. तसेच देवा नोकरकर यांच्या पत्नी भाग्यश्री देवा नोकरकर यांनी त्यांच्या राहत्या घरी सदर अग्निशस्त्र आणून दिल्याचे आरोपीने पोलिसांना सांगितले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक चंद्रपूर आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे आणि वरोरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश सोनटक्के यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

या प्रकरणी वरोरा पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ९०४/२०२६, कलम ३ व २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पिस्तूल पुरवठ्याशी संबंधित देवा नोकरकर व भाग्यश्री देवा नोकरकर यांचा पोलिसांकडून शोध सुरू असून पुढील तपास वरोरा पोलीस करीत आहेत.

## अमली पदार्थांविरोधात विद्यार्थ्यांना जागृती; व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ

**अक्षराज : संतोष बंडुरकर**

**दि.१८,गोंडपिपरी (चंद्रपूर) :** युवा पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यापासून दूर ठेवून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्ती बाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जनता विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, गोंडपिपरी येथे मंगळवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी अमली पदार्थांविरोधात जनजागृती व शपथग्रहण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या उपक्रमांतर्गत पोलीस स्टेशन, गोंडपिपरी यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य कोकाटे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस उपनिरीक्षक मंगेश कराडे उपस्थित होते. यावेळी नगरसेवक अनिल झाडे, पाळी प्रमुख पिंपळकर, ज्येष्ठ प्राध्यापक बांदुरकर, पत्रकार राजूभाऊ झाडे (देशोन्नती), पोलीस स्टेशन गोंडपिपरीचे सुनील गव्हारे आणि कु ममता गेडाम यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य श्री. कोकाटे यांच्या हस्ते मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सुनील गव्हारे यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियम आणि सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. नगरसेवक अनिल झाडे यांनी अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दिले. पत्रकार राजूभाऊ झाडे यांनी अमली पदार्थांचे व्यसन हे केवळ व्यक्तीचे नुकसान करणारे नसून संपूर्ण कुटुंब आणि समाजासाठी गंभीर संकट असल्याचे सांगितले. पोलीस उपनिरीक्षक मंगेश कराडे यांनी अमली पदार्थांच्या वाढत्या धोक्याबाबत विद्यार्थ्यांना प्रभावी मार्गदर्शन केले.



युवा अवस्था ही शिक्षण, स्वप्ने आणि भविष्य घडविण्याची महत्त्वपूर्ण वेळ आहे. त्यामुळे क्षणिक आकर्षण, कुतूहल किंवा चुकीच्या संगतीमुळे अमली पदार्थांच्या आहारी जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले. व्यसनाला नाही, तर आपल्या ध्येयाला होकार द्या. स्वतः व्यसनापासून दूर राहा आणि इतरांनाही त्यापासून दूर ठेवा, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य श्री.कोकाटे यांनी विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून सदैव दूर राहून शिक्षण, संस्कार आणि सकारात्मक विचारांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. यानंतर श्री. बांदुरकर यांनी उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांना अमली पदार्थांविरोधात जनजागृती करण्याची तसेच व्यसनमुक्त जीवन जगण्याची सामूहिक शपथ दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. बेझलवार मॅडम यांनी केले, तर आभार कु. जीवतोडे मॅडम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच 'व्यसनमुक्त युवा - सशक्त भारत' या संकल्पनेला बळ देणारा हा कार्यक्रम ठरला.

## जलदूत बनून पाण्यासाठी चालूया; मुख्यमंत्री फडणवीस यांचे आवाहन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, मुंबई :** आपला महाराष्ट्र समृद्ध आणि हिरवागार असावा, हे आपल्या सर्वांचे स्वप्न आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट रोजी संपूर्ण राज्यात 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना जलसंधारणाच्या या जनजागृती अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

२१ ऑगस्ट रोजी सकाळी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले आहे. या वॉकेथॉनमध्ये तरुणांसह सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.

जलसंधारणाचा संदेश प्रभावीपणे युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी रील्स स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत युवा पिढीने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

या ऐतिहासिक जलसंधारण मोहिमेत सहभागी होण्यासाठी राज्य शासनाच्या जाहिराती तसेच समाजमाध्यमांवर उपलब्ध असलेला अधिकृत क्यूआर कोड स्कॅन करून नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा, असे फडणवीस यांनी सांगितले.

जलसंधारण ही केवळ राज्य शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक असलेली लोकचळवळ आहे. त्यामुळे या जनजागृती अभियानात प्रत्येकाने सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे.

चला, एकत्र येऊया, जलदूत बनून पाण्यासाठी चालूया. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या मूलमंत्राला जगवूया, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

## शिरपूर सराफ दुकानातील चोरीचा छडा

### बुरखाधारी महिलांसह चौघांना अटक; ९ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त




**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१८, शिरपूर (धुळे) :**

शिरपूर शहरातील महात्मा गांधी कॉम्प्लेक्समधील सराफ दुकानातून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या मालेगाव येथील आंतरजिल्हा टोळीचा शिरपूर शहर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी तीन बुरखाधारी महिलांसह एका कार चालकाला अटक केली असून, त्यांच्याकडून कार व वितळवलेले सोने असा एकूण ९ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

**सीसीटीव्ही व फास्टॅगच्या मदतीने गुन्ह्याची उकल**

दिनांक ०५ ऑगस्ट रोजी सुरेंद्र सन्मुखलाल सराफ यांच्या दुकानातून अज्ञात तीन बुरखाधारी महिलांनी ६ लाख रुपये किमतीचे ४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे ८ जोड कानातले दागिने नजर चुकवून चोरून नेले होते. याप्रकरणी शिरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता संशयित महिला स्विफ्ट डिझायर कारने पसार झाल्याचे दिसून आले. फास्टॅग माहिती आणि गोपनीय खबऱ्याच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून सावळदे गावाजवळ या चौघांना शिताफीने ताब्यात घेतले.

**ताब्यात घेतलेले संशयित**

अन्नु उर्फ साजिदा बशीर खान वय ३६,

मन्नु उर्फ मुनसजा शेख गमीर वय २३,

रीजवाना जाकीर शेख वय ३५

नदिम शेख गयासोद्दीन शेख चालक वय ४२ सर्व राहणार मालेगाव

मुंब्रा येथून सोन्याची लगड हस्तगत

पोलीस कोठडीदरम्यान आरोपींनी चोरीचे दागिने मुंब्रा जि. ठाणे येथील सराफा व्यापारी इंदरचंद किशनजी मेहता याला विकल्याची कबुली दिली. पोलिसांनी मुंब्रा येथून ४०.१२० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड जप्त केली.

**हस्तगत केलेला मुद्देमाल**

सोन्याची लगड ४०.१२० ग्रॅम वजनाची ६ लाख रुपये किमतीची रक्कम, कार एम एच ०५ ए एक्स ७६८५ किंमत ३ लाख रुपये किमतीची कार व दोन अँड्रॉइड मोबाईल १० हजार रुपये किंमतीचे असा एकूण ९ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

तपासात संशयित अन्नु उर्फ साजिदा हिच्यावर यापूर्वी मुंबईतील कुर्ला आणि नागपाडा पोलीस ठाण्यात चोरीचे चार गुन्हे, तर मन्नु उर्फ मुनसजा हिच्यावर कुर्ला पोलीस ठाण्यात एक गुन्हा दाखल असल्याचे समोर आले आहे.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी, पोलीस अंमलदार रवींद्र आखडमल, अतुल पाटील, योगेश दाभाडे, गोविंद कोळी, विनोद आखडमल, भटू साळुंके, सचिन वाघ, प्रशांत पवार, आरीफ तडवी, सोमा ठाकरे, मनोज दाभाडे, मनोज महाजन, वर्षा चौधरी, मोहिनी कोकरे, चित्रा पावरा व मिथुन पवार यांनी केली.

## कल्याण फाटा दत्त मंदिराजवळ 'मृत्यूचा खड्डा'; मुंब्रा-नवी मुंबईवरून डोंबिवलीकडे जाणाऱ्यांची कोंडी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१८, शिळफाटा (ठाणे) :** कल्याण-शिळफाटा महामार्गावर दत्त मंदिराजवळ रस्त्याच्या मध्यभागी ड्रेनेजचे लोखंडी झाकण निघाल्याने मोठा खड्डा पडला आहे. या एका खड्ड्यामुळे संपूर्ण परिसरातील वाहतूक व्यवस्था कोलमडली असून हजारो नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

**कोणाला सर्वात जास्त फटका?**

मुंब्रा आणि नवी मुंबईवरून डोंबिवली, कल्याण पूर्वेकडे जाणाऱ्या वाहनचालकांना या खड्ड्याचा सर्वात मोठा फटका बसत आहे. अचानक ब्रेक मारावे लागत असल्याने सकाळी ९ ते १ आणि सायंकाळी ६ ते ९ या वेळेत येथे २ किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी होत आहे. शाळेच्या बस, रुग्णवाहिका आणि कार्यालयात जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेळेवर पोहोचणे मुश्किल झाले आहे.

**६ गंभीर समस्या समोर**

१. अपघाताचा धोका : मागील १५ दिवसात ३ दुचाकीस्वार खड्ड्यात पडून जखमी झाले आहेत. रात्री रिफ्लेक्टर नसल्याने धोका अधिक आहे.

२. वाहनांचे नुकसान : टायर फुटणे, अलॉय तुटणे आणि सस्पेन्शनचे प्रॉब्लेम वाढले आहेत. गॅरेजवाल्यांच्या म्हणण्यानुसार दररोज ८-१० तक्रारी येत आहेत.

३. वाहतूक कोंडी : खड्डा टाळण्यासाठी वाहने लेन बदलतात. त्यामुळे शिळफाटा ते कल्याण फाटापर्यंत जाम लागतो.

४. पादचारी आणि विद्यार्थी धोक्यात : दत्त मंदिराजवळ शाळा असल्याने विद्यार्थ्यांना गाड्यांमधून वाचवत रस्ता ओलांडावा लागतो.

५. पावसामुळे समस्या वाढली : खड्ड्यात पाणी साचल्याने खोली समजत नाही. त्यामुळे दुचाकीस्वार थेट आदळतात.

६. आपत्कालीन सेवा अडकल्या : गेल्या आठवड्यात रुग्णवाहिका २० मिनिटे या कोंडीत अडकून राहिल्याची घटना घडली.

प्रशासनाची बेफिकिरी

नागरिकांच्या तक्रारीनंतरही झथ्रू आणि महापालिकेकडून फक्त बॅरिकेड आणि 'रपसशअें'ची पाटी लावून जबाबदारी झटकण्यात आली आहे. १५ दिवसांपासून कोणतीही कायमस्वरूपी दुरुस्ती झालेली नाही.

स्थानिक सामाजिक कार्यकर्ते संजय कदम म्हणाले, दररोज ५० हजाराहून अधिक वाहने या मार्गावरून जातात. एवढ्या महत्वाच्या रस्त्याकडे प्रशासन का दुर्लक्ष करत आहे?

**नागरिकांच्या ३ ठळक मागण्या**

१. तातडीने खड्डा बुजवून नवीन झाकण बसवावे

२. रात्रीसाठी सोलर लाईट आणि रिफ्लेक्टर लावावेत

३. या रस्त्याची कायमस्वरूपी देखभालीची जबाबदारी निश्चित करावी.

# राज्याच्या शिष्यवृत्ती परीक्षेत पिंपरी गवळीचा यशवर्धन राज्यात प्रथम

## आमदार काशिनाथ दातेंकडून यशवर्धनचे कौतुक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गुणवत्तेने पुन्हा एकदा संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर येथील कुमार जयसिंगराव ढमढेरे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा इयत्ता चौथीतील विद्यार्थी यशवर्धन दत्तात्रय थोरात याने प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत तब्बल ३०० पैकी २९६ गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक पटकावून पारनेरच्या शैक्षणिक क्षेत्राचा लौकिक उंचावला आहे.

यशवर्धनच्या या उल्लेखनीय यशामागे पारनेर तालुक्यातील पळसपूर गावच्या मार्गदर्शक शिक्षिका सौ. जयश्री इघे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि जिद्दीची कोणतीही कमतरता नाही, हे यशवर्धनने आपल्या कामगिरीतून सिद्ध केले आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे प्रोत्साहन आणि विद्यार्थ्याची मेहनत यांचा सुरेख संगम झाला की ग्रामीण भागातील विद्यार्थीही राज्याच्या पातळीवर सर्वोच्च स्थान मिळवू शकतो, याचे हे प्रेरणादायी उदाहरण आहे.

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी यशवर्धन थोरात आणि मार्गदर्शक शिक्षिका जयश्री इघे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पारनेरच्या मातीतील या गुरूशिष्याचा संपूर्ण पुणे जिल्ह्यासह राज्याच्या शैक्षणिक नकाशावर उमटलेला हा गुणवत्तेचा ठसा निश्चितच कौतुकास्पद असून, ग्रामीण पारनेरची गुणवत्ता पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुकाच काय तर संपूर्ण राज्यातही अव्वल ठरू शकते हा आत्मविश्वास या यशामुळे अधिक दृढ झाला आहे. यशवर्धनच्या या उज्ज्वल कामगिरीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

> यशवर्धनने मिळवलेले राज्यातील प्रथम क्रमांकाचे यश हे केवळ त्याच्या कुटुंबाचा किंवा शाळेचा अभिमान नाही, तर संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करावेत, यशवर्धनची कामगिरी त्यांच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा देणाऱ्या शिक्षकांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. यशवर्धन आणि जयश्री मॅडम यांच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन.
>
> **– आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

# एमआयडीसीच्या भूसंपादनाला १३ गावांचा विरोध; जिल्हाधिकाऱ्यांसोबतची चर्चा निष्फळ

**अक्षराज : संतोष बंडुरकर**

**दि.१८,गोंडपिपरी (चंद्रपूर) :** आक्सापूर, करंजीसह परिसरातील १३ गावांमध्ये प्रस्तावित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) भूसंपादनाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी आयोजित करण्यात आलेली बैठक कोणत्याही ठोस निर्णयाविना निष्फळ ठरली. जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला खासदार प्रतिभा धानोरकर आणि माजी आमदार सुभाष धोटे यांचीही उपस्थिती होती. मात्र, शेतकऱ्यांनी सुपीक शेतजमीन एमआयडीसीसाठी देण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिल्याने प्रशासनासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. करंजी परिसरात प्रस्तावित एमआयडीसीसाठी सुमारे १० हजार एकर शेतजमीन संपादित करण्याचा प्रस्ताव आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील शेतकऱ्यांनी प्रकल्पाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. बैठकीत शेतकऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना, शेती ही केवळ उत्पन्नाचे साधन नसून कुटुंबाच्या उपजीविकेचा मुख्य आधार असल्याचे सांगितले. जमीन गेल्यानंतर भविष्यात उदरनिर्वाह कसा करायचा, असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

औद्योगिक विकासाला विरोध नसला, तरी शेतकऱ्यांना भूमिहीन करून विकास साधण्यास तीव्र विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने संवादातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, शेतकरी आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. यापूर्वीही ग्रामसभा तसेच विविध आंदोलनांच्या माध्यमातून प्रस्तावित एमआयडीसीला विरोध दर्शवण्यात आला होता. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ही शेतकऱ्यांचा एकमुखी विरोध कायम राहिला.

शेतकऱ्यांच्या या ठाम भूमिकेमुळे प्रस्तावित एमआयडीसी प्रकल्पासमोरील अडचणी आणखी वाढल्या आहेत. आता प्रशासन भूसंपादनाबाबत कोणती भूमिका घेते आणि शेतकरी-प्रशासन यांच्यातील हा संघर्ष पुढे कोणते वळण घेतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. बैठकीला शेतकरी एकता संघर्ष समितीचे सचिव माधव लडके, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अशोक रेचनकर, माजी अध्यक्ष तुकाराम झाडे, महेंद्र कुनघाडकर, देविदास सातपुते, सारनाथ बक्षी, दिलीप पुलगमकार, अतुल झाडे, राजेश डोंगरे, सूरज माडूरवार, राजू झाडे, नितीन मोरे, संजय वडस्कर, संदेश निमगडे, अमित भसारकर, रमेश भोयर, विलास कोहपरे, युवराज चुनारकर, गजानन ढवस, गणेश भोगेकर, उदयचंद जैन, अनुप चौधरी यांच्यासह १३ गावांतील शेतकरी उपस्थित होते.

# काँगेसच्या बिएलओंनी ‘एसआयआर’ प्रक्रिया जबाबदारीने करावे

## जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे; बल्लारपुरात बिएलओंची आढावा बैठक




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, विसापूर (चंद्रपूर) :** राज्यात मतदार यादींची विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) प्रक्रियेत गणना पत्रे भरून घेण्याची मुदत दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी पूर्ण झाली आहे. मतदारांचे नावे मतदार यादीतून वगळली जाणार नाही. प्रारूप मतदार यादी २४ ऑगस्ट रोजी जाहीर होणार आहे. त्यानंतर महिनाभरात मतदार यादीबाबत दावे व हरकती दाखल करण्याची संधी मिळणार आहे.यामुळे कांग्रेसच्या बिएलओंनी ’ एसआयआर ’ प्रक्रिया जबाबदारीने पार पाडावी, असे आवाहन चंद्रपूर जिल्हा कांग्रेसचे अध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांनी दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी बल्लारपूर येथे बिएलओंच्या आढावा बैठकीत केले. बल्लारपूर शहर व तालुका कांग्रेसच्या वतीने स्थानिक विशामगृहात कांग्रेस अंतर्गत बिएलओंची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते कार्यकर्त्यांना व बिएलओंना मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून खासदार प्रतिभा धानोरकर, बल्लारपूरच्या नगराध्यक्ष डॉ.अलका वाढई, उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक डॉ.अनील वाढई, तालुका कांग्रेसचे अध्यक्ष गोविंदा उपरे, बल्लारपूर विधानसभा बिएलओ – १ भास्कर माकोडे, महिला काँग्रेस अध्यक्ष अफसाना सय्यद, माजी नगराध्यक्ष छाया मडावी, ॲड.मेघा भाले, ॲड.पवन मेश्राम, मिना धानोरकर यांच्यासह काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी खा.प्रतिभा धानोरकर म्हणाल्या, आपण सर्वजण ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिका, नगरपंचायत, विधानसभा व लोकसभा निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. आपल्या मतदारांचे नावे ‘एसआयआर’च्या माध्यमातून कमी केले जाणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी. एकदा मतदार यादीतून नाव कमी झाले, तर निवडणूक आयोग पुन्हा मतदार म्हणून नावे समावेश करण्यासाठी कागदपत्रे जमा करण्याचा ससेमिरा लावणार आहे. या जाचातून मतदारांना बाहेर काढण्यासाठी कॅांग्रेसच्या बिएलओंनी जागृत राहून कार्य करावे, असे त्यांनी सांगितले. आढावा बैठकीचे संचालन व आभार प्रदर्शन नगरपरिषद उपाध्यक्ष देवेंद्र आर्य यांनी केले. यावेळी बल्लारपूर शहरातील व ग्रामीण भागातील मतदार केंद्र स्तरीय कांग्रेसचे बिएलओ व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# ठामपा शाळांतील विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे उद्घाटन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, ठाणे :** महानगरपालिका शिक्षण विभाग व राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे महानगरपालिका शाळांमधील आरोग्य तपासणी शिबिरांतर्गत हिमोग्लोबिनोपॅथी चाचणीचा शुभारंभ १५ ऑगस्ट २०२६ रोजी ठाणे मनपा शाळा क्र.६९, कळवा येथे करण्यात आला.

हिमोग्लोबिनोपॅथी हा अनुवांशिक रक्तविकारांचा एक महत्त्वाचा, परंतु अनेकदा दुर्लक्षित राहणारा गट. यामध्ये सिकलसेल ॲनिमिया, थॅलेसेमिया आणि हिमोग्लोबिनशी संबंधित इतर विकारांचा समावेश होतो. हे विकार पालकांकडून वारशाने मिळतात आणि एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे पसरत नाहीत.

नियमित तपासणीद्वारे (screening) लवकर निदान करणे ही हिमोग्लोबिनशी संबंधित विकारांचा भार कमी करण्यासाठी सर्वात प्रभावी रणनीतींपैकी एक आहे.

विशेषत: बालपण, किशोरवयीन अवस्था किंवा लग्नापूर्वी राबवल्या जाणाऱ्या तपासणी कार्यक्रमांमुळे अशा वाहकांची ओळख पटण्यास मदत होते, ज्यांना अन्यथा त्यांच्या अनुवांशिक स्थितीबद्दल माहिती मिळाली नसती. वेळेवर निदान झाल्यामुळे बाधित मुलांसाठी योग्य वैद्यकीय उपचार, लसीकरण, पोषणविषयक मदत आणि नियमित पाठपुरावा करणे शक्य होते, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारते आणि आरोग्याचे परिणाम अधिक चांगले मिळतात, याच अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांची चाचणी करण्यात आली.

यावेळी नगरसेविका अपर्णा साळवी, अधिष्ठाता राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय आणि छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा डॉ. स्वप्नाली कदम, सहाय्यक आयुक्त ललिता जाधव, डॉ.मोहित रोजेकर, जीवरसायनशास्त्र विभागप्रमुख कळवा हॉस्पिटल, URC प्रमुख मुस्ताक पठाण, रवींद्र पाटील, गटप्रमुख संतोष दळवी, CRC समन्वयक किरण लहामते, उषा फापाळे, विशेष शिक्षक प्रमिला म्हात्रे तसेच मुख्याध्यापक वैशाली प्रभू, प्रतिभा पाटील, शाबान शेख व शिक्षक उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत माध्यमिक शाळा क्र.२, शाळा क्र.११५, ७० व ६९ मधील एकूण २५० विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिनोपॅथी तपासणी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा यांच्या वैद्यकीय पथकाद्वारे करण्यात आली. हा उपक्रम डॉ.मिताली संचेती, उपायुक्त शिक्षण विभाग ठाणे मनपा, शिक्षणाधिकारी शेषराव बडे व गट अधिकारी संगीता बामणे आणि अधिष्ठाता डॉ स्वप्नाली कदम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.

# थोडक्यात बातम्या

## ढवळपुरी केंद्रातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये रायटिंड पॅडचे वाटप




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पारनेर तालुक्यातील ढवळपुरी केंद्रातील सर्व जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना रायटिंड पॅडचे वाटप करण्यात आले. युवा उद्योजक व आयटी इंजिनिअर प्रवीण फलके यांच्या संकल्पनेतून आणि युवा फाऊंडेशन, ढवळपुरी यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. ढवळपुरी केंद्रातील विविध वस्ती व गावांमधील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना रायटिंड पॅडचे वितरित करण्यात आले. रायटिंग पॅड हात मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. या उपक्रमाद्वारे केवळ शैक्षणिक साहित्याचे वाटप न करता विद्यार्थ्यांनी शिकावे, पुढे जावे आणि आपल्या गावाचे नाव उज्ज्वल करावे हा सकारात्मक संदेश देण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

प्रवीण फलके म्हणाले,आज एका विद्यार्थ्याच्या हात रायटिंग पॅड दिला, तर उद्या त्याच हात यशाची संधी असेल या विचारातूनच हा उपक्रम राबविला. सामाजिक व शैक्षणिक उपक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो व विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होते. असे मत फलके यांनी व्यक्त केले. यावेळी विविध शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ तसेच शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते. सर्वांनी या उपक्रमाचे स्वागत करत प्रवीण फलके आणि युवा फाऊंडेशन, ढवळपुरी यांचे अभिनंदन केले.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागन्यांसाठी चिमूर येथे एल्गार आंदोलन




**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१८, चिमूर (चंद्रपूर) :** विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच आदिवासी विद्यार्थ्यांच्या विरोधातील कथित काळा जीआर रद्द करण्याच्या मागणीसाठी चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे विद्यार्थ्यांनी एल्गार मोर्चा काढला. हुतात्मा स्मारक येथून सुरू झालेला हा मोर्चा प्रशासकीय भवनापर्यंत नेण्यात आला. यावेळी शेकडो विद्यार्थी सहभागी झाले होते. मोर्चानंतर प्रशासकीय भवनासमोर सभा घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर मार्गदर्शन करण्यात आले. अतुल देशमुख,ॲड. अनंता रामटेके, संजय बोधे, सुरेश डांगे,रामदास कामडी, बादल शीरामे, सागर बोरकर, वैभव ठाकरे, शुभम मंडपे, निलेश ननावरे, शुभांगी ठावरे, डॉ.आशिष पाटील, सुधाकर चौखे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक निलकंठ शेंडे यांनी केले, तर संचालन प्रकाश मेश्राम यांनी केले. निवेदनात आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. आदिवासी समाज व विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांबाबत शासनाच्या कार्यपद्धतीवर निर्माण झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर ही मागणी करण्यात आली आहे.

आदिवासी वसतिगृहांमध्ये सुरू असलेली सेंट्रल किचन पद्धत बंद करून समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांप्रमाणे नियमित व दर्जेदार मेस सुविधा सुरू करावी तसेच विद्यार्थ्यांना आरोग्यदायी व गुणवत्तापूर्ण आहार मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय गडचिरोली येथे सर्पदंशाच्या दुर्दैवी घटनेत मृत्यू झालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० लाख रुपये आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच या घटनेत जखमी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० लाख रुपये आर्थिक मदत देऊन त्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनाने करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीधारक आदिवासी विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांकडून फी आकारली जात असल्यास संबंधित महाविद्यालयांवर कठोर कारवाई करावी, तसेच शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांकडून अनधिकृतपणे फी वसूल करणाऱ्या महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी ही निवेदनातून करण्यात आली.

## विदेही सदगुरु जगन्नाथ बाबा बहुउद्देशीय बाबुपेठ संस्थेच्या वतीने स्नेहसंमेलन संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** विदेही सदगुरु जगन्नाथ बाबा बहुउद्देशीय संस्था, बाबूपेठ, चंद्रपूर व धनोजे कुणबी समाज बाबूपेठ, उपशाखेच्या सहकार्याने समाजबांधवांमध्ये स्नेह, एकोपा व सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने माना टेकडी येथील जगन्नाथ बाबा मठ येथे स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. धनोजे कुणबी समाजाच्या स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी धनोजे कुणबी समाज मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष संजय ढवस होते. यावेळी त्यांनी उपस्थित समाजबांधवांना मार्गदर्शन करताना समाजातील एकोपा, संघटन, शिक्षण आणि सामाजिक प्रगतीचे महत्त्व अधोरेखित केले. समाजातील प्रत्येक घटकाने एकजुटीने पुढे येऊन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण, संघटन, सामाजिक सहभाग तसेच युवक व महिलांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विविध सामाजिक उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्नेहसंमेलनाचा आनंद घेतला. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून ॲड.देवा पाचभाई उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विदेही सदगुरु जगन्नाथ बाबा बहुउद्देशीय संस्था, बाबूपेठ, चंद्रपूरचे अध्यक्ष मुकेश गाडगे, उपाध्यक्ष जयश्री वनासिंगे, सचिव अमोल मत्ते, कोषाध्यक्ष मंगेश देरकर तसेच सदस्य नरेंद्र सातपुते, किरण पिंगे, संदीप मुसळे, दिलीप पायपरे, तारा जोगी, गजानन उलमाले, तेजस्विनी पोडे, मंगेश बदकी, अश्विनी पिपळशेडे, साईनाथ उपरे, नीता बलकी, शैलेश ताजने, संगीता देरकर, दिवाकर भोयर, सविता चोखारे, वामन पिदुरकर, सुहासिनी देरकर, किरण बोबडे तसेच बाबूपेठ उपशाखेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक व समाजबांधवांमध्ये आपुलकीचे आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले. संघटन, एकोपा आणि सामाजिक प्रगती या भावनेने कार्यक्रम उत्साहात व आनंदात पार पडला.

## थोडक्यात बातम्या

# स्वातंत्र्यदिनी पोलीस दलासाठी अभिमानाचा क्षण

## युनूस कादर बागवान उत्कृष्ट सेवा पदक पुरस्काराने सन्मानित



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१७, बीड :** १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी बीड येथे भारत सरकार गृह मंत्रालय यांनी पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांना उत्कृष्ट व निष्कलंक सेवा बजवल्यामुळे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये स्थानिक गुन्हे शाखा, बीड येथे कार्यरत असलेले युनूस कादर बागवान यांना उत्कृष्ट सेवा पदक पुरस्काराने मा. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा च्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, गेवराई मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह अनेक जणांनी युनूस बागवान यांना शुभेच्छा दिल्या.

# कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे ११५ नागरिकांना मोफत आयुष्मान व आभा कार्डचे वाटप




**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.१८, कर्जत (रायगड) :** १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून उमरोळी ग्रामपंचायत हद्दीतील डिकसल येथे पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया, नवी दिल्ली व वैशाली सायबर कॅफे यांच्या संयुक्त विद्यमाने भारत सरकारच्या योजनेंतर्गत डिकसळ हनुमान मंदिर येथे नागरिकांसाठी मोफत आयुष्मान कार्ड व आभा कार्ड वाटपाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात रायगड जिल्हा परिषद सदस्या तथा बांधकाम, महिला व बालकल्याण समिती सदस्या सुवर्णा प्रदीप ठाकरे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व पूजनाने करण्यात आली. शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी दरवर्षी पोलिस मित्र सुरक्षा परिषद व वैशाली सायबर कॅफे यांच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून स्वातंत्र्य दिनी हा आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या मोफत कार्ड वाटप उपक्रमात तब्बल ११५ नागरिकांनी सहभाग घेत आयुष्मान कार्ड व आभा कार्ड काढून घेतले. त्यामुळे नागरिकांना शासनाच्या आरोग्यविषयक योजनांचा लाभ घेण्यास मोठी मदत होणार आहे. यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्या सुवर्णा प्रदीप ठाकरे, डॉ.ज्ञानेश्वर साळोखे, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष प्रफुल जाधव, तालुका महिला युवक अध्यक्ष प्राची जाधव, जिल्हा सदस्य संतोष थोरवे, सदस्य मयुरेश राजमहेंद्र पोळ, दयानंद म्हसे, भालचंद्र पाटील, रामचंद्र हातनोलकर, विश्वनाथ ठमाळ, ब्रह्मेश जाधव यांच्यासह पदाधिकारी, मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय वर्षावास प्रवचन मालिकेतील पुष्प क्रमांक ५ संपन्न



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१८, जुईनगर (नवी मुंबई) :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, आदर्श शाखा जुईनगरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय वर्षावास प्रवचन मालिका २०२६ मधील पुष्प क्रमांक ५ रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी उत्साहात संपन्न झाले. मुलगंध कुटी बुद्ध विहार, चिंचोली तलावाजवळ, सेक्टर २५, जुईनगर, नवी मुंबई येथे सायंकाळी ७ ते ९ या वेळेत प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात 'धम्म आणि विज्ञान' या विषयावर केंद्रीय शिक्षिका, मुंबई येथील आदरणीय प्राचीताई जाधव यांनी मार्गदर्शन केले. प्रवचनाच्या सुरुवातीला प्राचीताई जाधव यांनी मेत्ता भावना अर्थात मैत्री भावना कशी करावी, याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. प्रथम स्वतःवर, त्यानंतर इतरांवर, सर्व प्राणिमात्रांवर तसेच आपल्याशी मतभेद असलेल्या किंवा विरोधात असलेल्या व्यक्तींबद्दलही मैत्रीभावना निर्माण करण्याची ध्यानसाधना त्यांनी सोप्या पद्धतीने समजावून सांगितली. त्यानंतर त्यांनी धम्म आणि विज्ञान यांचा परस्परसंबंध विविध उदाहरणांच्या माध्यमातून साध्या व सोप्या भाषेत स्पष्ट केला. उपस्थितांनी प्रवचनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमासाठी पोपट वाघमारे व परिवार, जुईनगर यांनी धम्मदान देऊन अल्पोपहाराची व्यवस्था केली. कार्यक्रमाची सांगता सरणत्तय ग्रहण करून करण्यात आली.

# गावच्या लेकीची आर्थिक मदत; ग्रामदैवतांच्या मंदिराची गळती थांबली

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, उंब्रज (सातारा) :** गाव म्हणजे केवळ जन्म घेण्याची जागा नव्हे, तर संस्कार, ओळख आणि अस्तित्व देणारी मायभूमी असते. या मातीशी असलेली नाळ जपून तिचे ऋण फेडण्याची भावना मनात असली की, त्यातून घडणारे कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरते. कळंत्रेवाडी येथे अशाच एका संवेदनशील आणि कौतुकास्पद सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय आला. मौजे कळंत्रेवाडी येथील श्री म्हसोबा-लक्ष्मी ग्रामदैवतांच्या मंदिराचा स्लॅब गळत असल्याने गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराजवळ सातत्याने पाणी टिपकत होते. त्यामुळे परिसरात सतत ओलावा राहत होता. मंदिराची ही अवस्था लक्षात घेऊन गावची लेक असलेल्या एका माहेरवाशिणीने नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर मंदिराची गळती काढण्यासाठी आर्थिक मदतीचा हात पुढे केला. तिने पत्रकार रघुनाथ थोरात यांच्याशी संपर्क साधून मंदिराच्या दुरुस्तीच्या कामासाठी मदत करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर नाणेगाव येथील जाधव मिस्त्री यांच्याशी संपर्क साधून मंदिराच्या स्लॅबची गळती काढण्याचे काम सुरू करण्यात आले. जवळपास दोन दिवसांत हे काम पूर्ण झाले. पावसाळा सुरू असतानाही दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर मंदिराची गळती थांबली असून गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराजवळील सततचा ओलावाही दूर झाला आहे.विशेष म्हणजे, या मदतीमागे कोणताही गाजावाजा नाही, प्रसिद्धीची अपेक्षा नाही आणि स्वतःचे नाव पुढे करण्याची इच्छाही नाही. ज्या गावच्या मातीत बालपण गेले, ज्या भूमीने आपल्याला ओळख दिली, त्या जन्मभूमीचे काहीतरी देणे लागतो, या उदात्त भावनेतून गावच्या लेकीने केलेली ही मदत मनाला स्पर्शून जाणारी आहे.गाव सोडल्यानंतरही माहेरच्या मातीशी असलेली नाळ कायम ठेवत ग्रामदैवतांच्या मंदिरासाठी मदतीचा हात पुढे करणे, ही भावना आजच्या काळात निश्चितच कौतुकास्पद आहे. प्रसिद्धीपासून दूर राहून केलेल्या या निःस्वार्थ मदतीतून समाजापुढे एक आदर्श निर्माण झाला आहे. माहेरच्या मातीचे ऋण आणि ग्रामदैवतांप्रती श्रद्धा जपत गावच्या लेकीने दिलेला हा मदतीचा हात निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे.

# शिव्यांची लाखोली, हातवारे करत महिलांचा परंपरागत बोरी आणि सुखेडचा बार संपन्न

**अक्षराज : स्वप्निल जावळे**

**दि.१८, खंडाळा (सातारा) :** राज्यात अनेक भागात खूप वेगवेगळ्या आणि अनोख्या प्रथा आहेत. मात्र शिव्या देण्याची अनोखी प्रथा सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात सुखेड आणि बोरी या दोन गावात नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी साजरी केली जाते वाद्यांच्या कडकडात या दोन्ही गावातील महिला एकमेकींना शिव्या ची लाखोली वाहत बोरीचा बार घातला जातो.

नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील सुखेड आणि बोरी गावातील महिला एकमेकींना शिव्यांची लाखोली वाहत बोरीचा बार घालतात शिव्यांच्या लोखोलीत व वाद्याच्या कडकडात हा बार दोन्ही गावातील सीमेवर असणाऱ्या ओढ्यावर आज मंगळवार दिनांक १८ऑगस्ट २०२६ रोजी पार पडला. यावेळी दोन्ही गावातील महिलांच्या शिव्या इतरांना ऐकू जाऊ नयेत म्हणून यावेळी दोन्ही गावातील वाजंत्री मंडळी कडून जोरजोरात वाद्य वाजवण्यात आले तर या महिलांना रोखण्यासाठी दोन्ही गावातील पुरुष मंडळी सह मोठा पोलीस बंदोबस्त लोणंद पोलीस प्रशासनाकडून यावेळी ठेवण्यात आला होता या आगळ्यावेगळ्या परंपरेबाबत येथील ग्रामस्थांकडून एक आख्यायिका सांगण्यात आली की पूर्वी या दोन्ही गावातील दोन महिला या ओढ्यावर कपडे धुण्यासाठी



या ठिकाणी आल्या होत्या.

या दोघींचे या ठिकाणी कडाक्याचे भांडण झाले. भांडण इतके टोकाला गेले की या दोघेही भांडता भांडता या ठिकाणीच मरण पावल्या तो दिवस हा नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी होता तेव्हापासून ही परंपरा चालू झाली ती आजपर्यंत चालू आहे बोरीचा बार साजरा होताना हलगी व सनईच्या सुरात महिलांना अधिकच जीव जडत होता बार सुरू होण्यापूर्वी दोन्ही गावातील महिला ग्रामदेवताच्या मंदिरासमोर एकत्र येत असतात या ठिकाणी नागपंचमीला खेळले जाणारे परंपरागत झिम्मा फुगडी फेर धरणे खेळ या खेळतात बरोबर बारा वाजता दोन्ही गावातील महिला हलगी डफडे व सनईच्या आवाजात हातवारे करत पुढे पर्यंत धावत येतात त्यानंतर साधारण अर्धा ते पाऊण तास वाद्याच्या दंतदनाटात जोरदार हातवरे करत ओढ्याच्या काठावर उभे राहून पलीकडील काठावर असलेल्या महिलांवर शिव्यांचा बडीमार करत बोरीचा बार साजरा करतात साधारण एक तासानंतर दोन्ही गावातील महिला परत आपापल्या गावातील ग्रामदैवतेच्या मंदिरासमोर येत पारंपारिक झिम्मा फुगडी काटवट कणा फेर धरून खेळतात हा शिव्यांच्या लाखोलीत होणारा बोरीचा बार पाहिला सातारा जिल्ह्यातील तरुण महिला व अहवाल वृद्धासह अगदी पर जिल्ह्यातील हौशी मंडळी देखील हा बार पाहण्यासाठी येत असतात असा हा बोरीचा बार यावर्षी अगदी उत्साहात व निर्विघ्नपणे पार पडला हा बार निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी लोणंद पोलिस स्टेशन चे पोलीस अधिकारी शिवाजीराव जायपत्रे आणि सहकारी कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

त्यानंतर बोरी गावामध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अमरदीप क्रीडा मंडळ बोरी यांच्या वतीने दोन दिवशीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात करण्यात होते.

# चंद्रपूरच्या विकासासाठी गडकरींचा सकारात्मक दृष्टिकोन प्रेरणादायी - आ.किशोर जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** चंद्रपूरच्या वाढत्या शहरीकरणासोबत भविष्यातील वाहतुकीची गरज लक्षात घेता बहुप्रतिक्षित रिंग रोड प्रकल्पासाठी आता सकारात्मक दिशा मिळाली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी रिंग रोड अत्यंत गरजेचा आहे. तो सुरू झाला असे समजून कामाला लागा, असे स्पष्ट करत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. त्यांच्या या भूमिकेमुळे चंद्रपूरच्या रिंग रोड प्रकल्पाच्या दृष्टीने आशादायी वातावरण निर्माण झाले असून, फ्लायओव्हरच्या विषयावरही सविस्तर चर्चा झाली असल्याची माहिती आ. किशोर जोरगेवार यांनी दिली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे नागपूर येथील महाल परिसरातील नवीन निवासस्थानी स्थलांतरित झाल्याबद्दल आ. किशोर जोरगेवार यांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. यानंतर झालेल्या चर्चेत चंद्रपूर शहराच्या पायाभूत विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या रिंग रोड आणि फ्लायओव्हरच्या विषयांकडे त्यांनी केंद्रीय मंत्र्यांचे लक्ष वेधले. चंद्रपूरच्या भविष्यातील गरजा लक्षात घेता हे दोन्ही प्रकल्प शहराच्या विकासासाठी



अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चंद्रपूर शहराचा झपाट्याने विस्तार होत असून शहराची लोकसंख्या आणि वाहनांची संख्या सातत्याने वाढत आहे. परिणामी प्रमुख मार्गांवर वाहतुकीचा ताण वाढत असून अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. शहरातील अंतर्गत वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासोबतच भविष्यातील वाढता वाहतुकीचा भार कमी करण्यासाठी रिंग रोड महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. शहराच्या विविध भागांना जोडणारी सक्षम वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे आ. जोरगेवार यांनी सांगितले.

यावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी चंद्रपूरच्या विकासाबाबत सकारात्मक दृष्टिकोन व्यक्त केला. रिंग रोड अत्यंत गरजेचा आहे. तो सुरू झाला असे समजून कामाला लागा, असे सांगत त्यांनी या प्रकल्पाला सकारात्मक पाठबळ दिले. केंद्रीय मंत्र्यांच्या या भूमिकेमुळे चंद्रपूरकरांच्या अनेक वर्षांच्या अपेक्षांना नवी आशा मिळाली असून, रिंग रोडच्या कामाला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यावेळी फ्लायओव्हरच्या विषयावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील वाढती वाहतूक, प्रमुख चौकांवरील वाहतूक कोंडी आणि भविष्यातील शहरी विस्तार लक्षात घेता फ्लायओव्हरची आवश्यकता असल्याचे आ. जोरगेवार यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. फ्लायओव्हरच्या माध्यमातून शहरातील वाहतुकीचा वेग वाढण्यासोबतच नागरिकांचा वेळ आणि इंधनाची बचत होणार आहे. त्यामुळे रिंग रोडसोबतच फ्लायओव्हरच्या प्रकल्पालाही गती मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रिंग रोड आणि फ्लायओव्हरसारखे महत्त्वाचे प्रकल्प प्रत्यक्षात साकारल्यास चंद्रपूरच्या वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यासोबतच शहराच्या विविध भागांतील संपर्क व्यवस्था अधिक सक्षम होईल. याचा थेट फायदा नागरिक, व्यापारी, उद्योजक तसेच शहराच्या एकूण विकासाला होणार आहे. त्यामुळे या प्रकल्प केवळ वाहतुकीच्या दृष्टीने नव्हे, तर चंद्रपूरच्या भविष्यातील सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पाहणे आवश्यक असल्याचे आ. जोरगेवार यांनी सांगितले.

चंद्रपूरच्या पायाभूत विकासासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रकल्पांना गती मिळावी, यासाठी आपला पाठपुरावा सातत्याने सुरू राहणार आहे. रिंग रोड आणि फ्लायओव्हर या दोन्ही प्रकल्पांना प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे आ. किशोर जोरगेवार यांनी सांगितले.

# खरीप हंगाम २०२६ : ई-पीक पाहणीसाठी निफाडचे तहसीलदार थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

> शासकीय योजना व मदतीसाठी ई-पीक पाहणी आवश्यक
>
> शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची अचूक व वस्तुनिष्ठ नोंद स्वतःहून करणे अत्यंत गरजेचे आहे. या अधिकृत नोंदीच्या आधारेच शासनाचे विविध लाभ, पीक विमा संरक्षण आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात मिळणारी आर्थिक मदत निश्चित होते. महसूल विभागामार्फत यासाठी व्यापक जनजागृती सुरू असून, शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत ई-पीक पाहणी पूर्ण करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा.
>
> **– विशाल नाईकवाडे, तहसीलदार, निफाड**

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** खरीप हंगाम २०२६ अंतर्गत ई-पीक पाहणीची मोहीम प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने राबवण्यासाठी निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी मौजे शिरसगाव येथील गट क्रमांक ३५० मधील शेताच्या बांधावर प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

या दौऱ्यादरम्यान त्यांनी शेतातील पिकांची सद्यस्थिती, पिकांचे प्रकार




तसेच प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्राची खातरजमा केली. सोबतच ई-पीक पाहणी नोंदणी प्रक्रियेचा प्रत्यक्ष आढावा घेत उपस्थित शेतकरी व महसूल कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

खरीप हंगाम २०२६ मधील ई-पीक पाहणीचे उद्दिष्ट निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी महसूल यंत्रणा अलर्ट मोडवर असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईल ॲपद्वारे पिकांची अचूक नोंदणी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## वाचक पत्र

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भविष्यातील विद्यापीठांची कसरत...

कृत्रिम बुद्धिमत्ता हि उच्चशिक्षण क्षेत्रासमोरील सर्वात मोठ्या परिवर्तनकारी शक्तीपैकी एक आहे. विद्यापीठांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा की नाही, हा प्रश्न आता राहिलेला नाही प्रश्न हा आहे. एआयचा वापर जबाबदारीने आणि नैतिकतेने कसा करायचा ? एआय अध्यापन, मूल्यमापन, संशोधन, प्रशासन, आणि विद्यार्थी सेवा यामध्ये अमुलाग्र बदल घडवू शकते. त्याचवेळी शैक्षणिक प्रामाणिकता, डेटा गोपनीयता, बौद्धिक संपदा आणि शिक्षकांच्या बदलत्या भूमिकेसारखे प्रश्नही निर्माण होतात म्हणून भविष्यातील विद्यापीठ हे एआय एनेबेल्ड पण ह्युमन सेंटर्ड असले पाहिजे तंत्रज्ञानाने शिक्षकांची भूमिका संपवू नये उलट ती अधिक प्रभावी करावी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात चिकित्सक विचार, नैतिक निर्णयक्षमता, सर्जनशीलता, सहानुभूती, आणि मानवी विवेकाचे महत्त्व अधिक



वाढणार आहे. उच्चशिक्षणाचे भविष्य हे विद्यापीठे जागतिक स्पर्धात्मकता, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय उद्दिष्टे यांचा समन्वय किती प्रभावीपणे साधतात यावर अवलंबून आहे. भारताला परदेशी विद्यापीठांचे केवळ अनुकरण करणारी विद्यापीठे नको आहेत भारताच्या बौद्धिक परंपरेतून आणि आधुनिक आकांक्षांमधून शक्ती घेऊन जागतिक स्तरावर मान्यता मिळविणारे ज्ञान निर्माण करणारी विद्यापीठे आवश्यक आहेत.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

# टाकळी ढोकेश्वर येथे ४०० फुटी तिरंग्याची भव्य रॅली; ढोकेश्वर विद्यालयात घुमला देशभक्तीचा गजर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** श्री ढोकेश्वर विद्यालयातील ध्वजारोहणानंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने गावातून सुमारे चारशे फूट लांबीचा भव्य तिरंगा घेऊन रॅली काढण्यात आली. या रॅलीमुळे गावातील प्रमुख रस्ते आणि चौक तिरंगामय झाले होते. लेझीम पथकाच्या आकर्षक सादरीकरणासह देशभक्तीपर व भक्तिमय गीतांनी वातावरणात उत्साह आणि देशप्रेमाची भावना निर्माण केली.

टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर विद्यालय येथून विद्यार्थी परिषदेचे जिल्हा संयोजक रोहन भुजबळ, अभिजित नरसाळे, कुणाल गोंडवाळ व भावेश बेलोटे व मान्यवरांच्या उपस्थितीत तिरंगा रॅलीला प्रारंभ करण्यात आला. हातात तिरंगा घेऊन विद्यार्थी, शिक्षक व नागरिक मोठ्या उत्साहाने रॅलीत सहभागी झाले होते. रॅली मार्गावर नागरिकांनी ठिकठिकाणी थांबून भव्य तिरंग्याचे स्वागत केले.

लेझीम पथकाच्या तालावर आणि देशभक्तीपर गीतांच्या सुरावर सहभागींचा उत्साह अधिकच वाढला.रॅली महात्मा फुले चौक, मेन रोड, गावातील मुख्य चौक, मार्गे गावातील वेशीसमोर पोहोचले. या संपूर्ण मार्गावर नागरिकांची उत्सुकता पाहायला मिळाली. चारशे फ ूट लांबीचा तिरंगा रस्त्यावरून जात असताना अनेकांनी त्याचे छायाचित्रण केले. या अनोख्या उपक्रमामुळे टाकळी ढोकेश्वर गावात स्वातंत्र्यदिनाचा उत्साह अधिकच वाढला.

ज्युनियर कॉलेजचे समन्वयक अशोक गांगड यांनी सर्व विद्यार्थ्यांना साक्षरतेची, कॉपीमुक्ततेची व व्यसनमुक्तीची शपथ दिली. यादरम्यान विद्यालयात सांस्कृतिक व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या या भव्य तिरंग्यामुळे रॅलीचा मार्ग आकर्षणाचे केंद्रबिंदू बनला होता.

यावेळी इंजिनिअर बबनराव खिलारी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लहू जाधव, उपाध्यक्ष शिवराज भालके, सरपंच अरुणा खिलारी, उपसरपंच रामभाऊ तराळ, चेअरमन नारायण झावरे, मोहनराव रांधवण, माजी सरपंच शिवाजी खिलारी, पंडितराव झावरे, पत्रकार बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



स्वातंत्र्यदिन हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा दिवस आहे. तिरंगा हा केवळ ध्वज नसून देशाच्या स्वाभिमानाचे आणि बलिदानाचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांच्या माध्यमातून देशभक्तीची भावना मनात रुजवावी. राष्ट्राच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा.
**– सिताराम खिलारी**

# प्रकाश हायस्कूल व जुनिअर कॉलेज येथे स्वातंत्र्य दिन साजरा; गुणवंत विद्यार्थी याचा सत्कार

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, कांद्री (रामटेक) :** देशाच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कांद्री माईन येथे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात पार पडला. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. यावेळी परिसरात देशभक्तीपर वातावरण निर्माण झाले होते.

स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना त्यांना भविष्यातही शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून प्रगती करण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरलेल्या संगीतमय कवायत करण्यात आले. हातात तिरंगा ध्वज घेऊन मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' आणि देशभक्तीपर घोषणांनी देशभक्तीचा उत्साह आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पाहायला मिळाला.

याप्रसंगी कांद्री ग्रामपंचायतचे सरपंच ममता बनसोड, महिला कोपरटीव चा अध्यक्ष गौतमा राऊत, केंद्रीय समन्वक अतुल देशमुख, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत ढोरे, संजय पन्नासे,पोलीस पाटील पौनीकर, उपसरपंच राजा कठोते मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि नव्या पिढीमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत करण्याचा संदेश देण्यात आला. संगीतमय



कवा यत, विद्यार्थी यांची भाषण व वर्ग १० व १२ चा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे कांद्री (माईन) परिसरात स्वातंत्र्य दिनाचा आनंद द्विगुणित झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ कामिनी पाटील, आभार विजय लांडे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्याम गासम वार, अशोक नाटकर, प्रशांत सरपाते, सुचिता नागपुरे, अनिता खंडाईत, ज्योत्स्ना मेश्राम, अनिता बागडे, बसंत ठकराले, प्रभाकर खंडाते, मिलिंद वाघमारे प्रयत्नशील होते.

# तहसीलदारांनी जप्त केलेल्या वाळू साठ्यावर चोरांचा डोळा

## खापरखेडा पोलिसांची धडक कारवाई; ४२ लाखांच्या मुद्देमालासह आरोपी गजाआड

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** सावनेर तहसीलदारांनी जप्त केलेल्या वाळू साठ्यातूनच थेट वाळूची चोरी करणाऱ्या रेती माफियांच्या मुसक्या आवळण्यात खापरखेडा पोलिसांना यश आले आहे. १७ ऑगस्टच्या मध्यरात्री वलनी वेकोलि वसाहत शिवारात ही धडक कारवाई करण्यात आली असून पोलिसांनी एका १२ चाकी ट्रकला ४ ब्रास वाळू आणि जेसीबीसह पकडले. सदर कारवाईत एक आरोपी गजाआड झाला असून एकूण ४२ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वलनी वेकोलि वसाहत शिवारात गस्त पोलिस गस्त घालत होते. यावेळी पोलीसांना जप्त केलेल्या वाळू




साठ्याजवळून एक संशयास्पद १२ चाकी ट्रक क्रमांक एमएच-४०-डीए-७६७३ जाताना दिसला, शिवाय एक जेसीबी मशीनही उभी आढळून आली पोलिसांनी ट्रकची पाहणी केली असता त्यात ४ ब्रास वाळू भरलेली दिसून आली.

यावेळी ट्रक चालक विक्की प्रकाश मेश्राम (२५) बिना (संगम) याला वाळूच्या रॉयल्टी बाबत विचारणा केली असता तहसीलदारांनी जप्त केलेल्या वाळू साठ्यावरून ही वाळू भरून दिल्याची कबुली दिली. खापरखेडा पोलिसांनी तत्काळ ट्रक चालक विक्की मेश्राम याला ताब्यात घेऊन अटक केली. कार्यवाही दरम्यान १२ चाकी ट्रक, जेसीबी मशीन, ४ ब्रास वाळू असा एकूण ४२ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी जेसीबी मालक धर्मेंद्र यशवंत वासनिक(३८) कोराडी व ट्रक मालका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून खापरखेडा पोलीस पुढील तपास करत आहेत.

### २०१९ पासून साठा पडून

### लिलाव कधी होणार?

१२ ऑक्टोबर २०१९ रोजी वलनी शिवारात तत्कालीन तहसीलदार दीपक करांडे, नायब तहसीलदार सतीश मिसाळ आणि मंडळ अधिकारी होमेश्वर पवार यांनी संयुक्त धाड टाकून तब्बल ४० ब्रास वाळू साठा, चार ट्रक आणि एक जेसीबी जप्त केला होता. जप्त केलेल्या वाळू साठ्याची देखरेख करण्याची जबाबदारी स्थानिक कोतवालाकडे सोपवण्यात आली होती. मात्र, मौजा पिपळा डाकबंगला येथे कोतवाल पद रिक्त असल्याने या वाळू साठ्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले. गेल्या काही वर्षांपासून या जप्त साठ्याचा लिलाव करण्यात आला नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. प्रशासकीय दिरंगाईम ुळे उघड्यावर पडलेला हा वाळूचा साठा चोरट्यांसाठी मोफत खजिना ठरला आहे.

# पारनेर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

## गोरेगावच्या रंगनाथ नरसाळेंना दोन राष्ट्रीय सेवा पदके



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** कर्तव्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर देशसेवा करणाऱ्या पारनेर तालुक्यातील गोरेगावच्या सुपुत्राला केंद्र सरकारने गौरवले आहे.

महाराष्ट्र पोलिस दलातील अधिकारी रंगनाथ जयराम नरसाळे यांची 'उत्कृष्ट सेवा पदक' आणि 'अति-उत्कृष्ट सेवा पदक' साठी निवड झाली आहे. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने स्वातंत्र्यदिनानिमित्त ही घोषणा केली. पोलिस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या गुणवत्तापूर्ण आणि निष्कलंक सेवेसाठी ही पदके दिली जातात. गोरेगावसारख्या ग्रामीण भागातून पुढे येत पोलिस दलात स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या नरसाळे सरांच्या या यशामुळे तालुक्यातील युवकांसमोर कर्तव्य आणि मेहनतीचा आदर्श उभा राहिला आहे. बातमी समजताच परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सिताराम खिलारींच्या हस्ते ध्वजारोहण; ५०० फूट तिरंग्याने लक्ष वेधले

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी बोलताना खिलारी म्हणाले की, स्वातंत्र्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी बलिदान



दिले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या त्यागाचे स्मरण करून देशासाठी कार्य केले पाहिजे. यावेळी ज्युनिअर कॉलेजचे समन्वयक अशोक गांगड यांनी विद्यार्थ्यांना साक्षरता, कॉपीम ुक्तता आणि तंबाखू मुक्ततेची शपथ दिली. विद्यालयात देशभक्तीपर संगीत कवायत, सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व, निबंध, रांगोळी स्पर्धा आणि सायकल रॅली घेण्यात आल्या. प्रभात फेरीतील ५०० फूट लांबीचा तिरंगा ध्वज हे प्रमुख आकर्षण होते. याचे नियोजन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदचे रोहन भुजबळ, अभिजीत नरसाळे, कुणाल गोंडवाळ, भावेश बेलोटे यांनी केले.

कार्यक्रमात १० वी-१२ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला लहूशेठ जाधव, अरुणाताई खिलारी, रामभाऊ तराळ, नारायण झावरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक बाळासाहेब निवडुंगे, सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव आणि आभार प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी मानले.

## थोडक्यात बातम्या

# उरण एसटी बस स्थानकावर सिद्धांत सेवा संस्थेतर्फे वृक्षारोपण



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, उरण :** भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८व्या वर्धापन दिनानिमित्त जाहीर करण्यात आलेल्या वृक्षारोपण संकल्पनेला साथ देण्यासाठी सिद्धांत सेवा संस्था, पनवेल-रायगड यांच्या वतीने उरण आगाराच्या बस स्थानक परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने सिद्धांत सेवा संस्था गेल्या १५ वर्षांपासून विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत बस स्थानक परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. लागवड केलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमास उरण आगाराचे आगार व्यवस्थापक तुषार गंद्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच उरण आगारातील अधिकारी, कर्मचारी, चालक व वाहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिद्धांत सेवा संस्थेचे अध्यक्ष विजय कोळी, उपाध्यक्ष शशिकांत गोरड, सचिव मिलिंद जाधव, खजिनदार अरुण दुष्मीकर, स्वामीनी पाठक, पितळे, वसंत वास्के, महावीर उरुणकर तसेच एसटी आगारातील राजेंद्र गायकवाड, संदेश म्हात्रे, कादंबरी म्हात्रे, सुचिता गावंड, ममता बोडके आणि शिवानी बांदल यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा आणि पर्यावरणाचे रक्षण करा' हा संदेश देत प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. पर्यावरण संवर्धनासाठी भविष्यातही विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याचा निर्धार संस्थेने व्यक्त केला.

# यशवंत प्राथमिक विद्यालयात भारतीय ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१८, शिरपूर :** शिरपूर येथील यशवंत प्राथमिक विद्यालयात १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त उत्साहपूर्ण आणि देशभक्तीपर वातावरणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास सशस्त्र सेना दलातील सैनिक देवगुरू विक्रम गोसावी, नगरसेविका पुजाताई कमलेश सोनार तसेच शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. वीरेंद्र गांगुर्डे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमप्रसंगी सैनिक देवगुरू विक्रम गोसावी यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यातील विशेष प्रसंग सांगत देशभक्ती, राष्ट्रप्रेम आणि एकतेचे महत्त्व पटवून दिले. देशसेवा ही केवळ सीमेवर जाऊनच करता येते असे नाही, तर देश स्वच्छ ठेवणे, वृक्षारोपण करणे, पर्यावरणाचे संवर्धन करणे तसेच जातीभेद विसरून एकतेने व बंधुभावाने राहणे हे देखील देशरक्षणासाठीचे महत्त्वपूर्ण कार्य आहे, असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

यानंतर सुवर्णा महाले व मनाली पोतदार यांनी विद्यार्थ्यांकडून देशभक्तीपर गीतांवर सुंदर कवायत व संचलन करून घेतले. विद्यार्थ्यांनी 'तिरंगा' कवितेवर मनम ोहक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

शाळेच्या मुख्याध्यापिका धनश्री कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व सांगत राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि देशप्रेम याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अनिता पाटील यांनी 'तिरंगा गीत' सादर करून त्यामागील भावार्थ व म हत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चेतना चव्हाण, प्रतिभा बाविस्कर, वैशाली मोरे, जागृती गरूड, मानसी पाठक, मेघा कुलकर्णी, मंजू बनभेरू व

आनंदा दादरेकर यांनी विशेष मेहनत घेतली. देशभक्तीचा जागर, तिरंग्याचा अभिम ान आणि एकतेचा संदेश देत यशवंत प्राथमिक विद्यालयाचा स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम उत्साहात व आनंदमय वातावरणात संपन्न झाला.

# चारठाण्यातून श्रीक्षेत्र औंढा नागनाथकडे भव्य कावड यात्रेचे प्रस्थान



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.१८, चारठाणा (परभणी) :** प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही चारठाणा ते श्रीक्षेत्र औंढा नागनाथ (ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली) येथे जाणाऱ्या भव्य कावड यात्रेचे उत्साहात प्रस्थान झाले. यावेळी गावातील भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कावड यात्रेच्या प्रस्थानप्रसंगी ह.भ.प. नामदेव महाराज ढवळे, मिनाताई राऊत, नानासाहेब दादा राऊत, पंचायत समिती सदस्य तहेसीन देशमुख, रुद्रेश्वर महाराज गजमल, डॉ.महेंद्र महाराज शर्मा, सरपंच अनिरुद्ध चव्हाण, उपसरपंच वाजेद कुरेशी, पोलीस उपनिरीक्षक वाघ साहेब यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुनमताई तमशेटे, भारत तोडकरे, विशाल निकाळजे, सुधाकर भवाळे, शिवशंकर तमशेटे, बाबासाहेब म्हेत्रे, आण्णासाहेब राऊत, माने साहेब, विठ्ठल गिते, सय्यद युसुफ, शिवाजीराव घुगे, पवन राऊत, अंकुश लोखंडे यांच्यासह गावातील भाविक सहभागी झाले.

हर हर महादेवच्या जयघोषात कावड यात्रेला सुरुवात करण्यात आली. यात्रेत सहभागी भाविकांनी भक्तिमय वातावरणात श्रीक्षेत्र औंढा नागनाथकडे प्रस्थान केले. या कावड यात्रेमुळे चारठाणा परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.